औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवाये समर्पिता

दिनांक २०.०९.२००८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शनिवार दिनांक २० सप्टेंबर २००८ रोजी मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी १-२० वा. वंदेमातरम या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त श्री.दिलीप बंड,नगरसचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे पालिका सदस्य उपस्थित होते.

०१. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
०२. स.स.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
०३. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
०४. स.स.श्री.अशरफ मोतीवाला
०५. स.स.श्री.सुरे सीताराम इसराम
०६. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०७. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०८. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
०९. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
१०. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
११. स.स.श्री.जेम्स अंबिलढगे
१२. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१३. स.स.सौ.विजयाताई बनकर
१४. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१५. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१६. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१७. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१८. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१९. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२०. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२१. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२२. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी
२३. स.स.सौ.सुशिला भगवान रगडे
२४. स.स.श्रीमती मिराबाई रामराव शिंदे
२५. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२६. स.स.सौ.बेंद्रे विमल तुकाराम
२७. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
२८. स.स.श्रीमती खान अजरा जबीन मसुद खान
२९. स.स.श्रीमती खान मेहरून्नीसा खान हमीद
३०. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
३१. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र

३२. स.स.श्रीमती यास्मीन बेगम अब्दुल कदीर
३३. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
३४. स.स.श्री.अ.रशिद खान (मामु) हमीद खान
३५. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
३६. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३७. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३८. स.स.श्रीमती कुरैशी नजमा बेगम युनुस
३९. स.स.श्री.खान निसार मोहमंद खान
४०. स.स.श्री.शेख इब्राहीम पटेल शेख इमाम
४१. स.स.श्री.हाजी शेर खान अ.रहेमान
४२. स.स.श्री.दत्ताभाऊ अण्णासाहेब पाथ्रीकर
४३. स.स.श्री.अशोक गोरखनाथ विरकर
४४. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४५. स.स.श्रीमती शेख शमशाद बेगम शेख हफिज
४६. स.स.श्री.संतोष सुधाकर जेजुरकर
४७. स.स.श्री.तुपे त्र्यंबक गणपतराव
४८. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४९. स.स.श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
५०. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५१. स.स.श्री.डॉ.कराड भागवत किसनराव
५२. स.स.श्री.रेणुकादास दत्तोपंत वैद्य
५३. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५४. स.स.सौ.रेखा कैलास काथार
५५. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
५६. स.स.डॉ.बिनवडे आशा उत्तमराव
५७. स.स.श्री.खुडे विजय किसनराव
५८. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
५९. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६०. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६१. स.स.सौ.ससाणे सरिता अशोक
६२. स.स.श्री.भगवान (बापु) देविदासराव घडमोडे
६३. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६४. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६५. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
६६. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
६७. स.स.सौ.जाधव संगिता विठ्ठलराव
६८. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
६९. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
७०. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
७१. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७२. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७३. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
७४. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ

७५. स.स.श्री.संजय पांडुरंग शिरसाट
७६. स.स.सौ.जैन अल्पा विकास
७७. स.स.श्रीमती मोमीन सोफिया फिरदोस अय्युबखान
७८. स.स.सौ.अनिता नंदकुमार घोडेले
७९. स.स.श्री.विनोद सोनवणे

नामनिर्देशित पालिका सदस्य

०१. स.स.श्री.संजय किसनराव केनेकर
०२. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
०३. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०४. स.स.श्री.सुरेंद्र माणिकराव कुलकर्णी

चर्चा :

श्री.संतोष खेंडके :दिल्लीत झालेल्या बॉम्बस्फोट घटनेत लोकांचा मृत्यू झाला याच बरोबर मोहनचंद शर्मा पोलीस निरीक्षक यांचाही आतंकवादी यांचेशी सामना करतांना शहीद झाले, त्यांनाही या सभागृहाच्या वतीने श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.अ.रशिद खान :यास माझे अनुमोदन आहे तसेच ओरीसामध्ये चर्चवर जो हल्ला झाला बदनामी होत आहे या घटनेचा ही निषेध करण्यात यावा

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : कर्नाटक ओरिसा सरकांरचा निषेध करून दोन्ही सरकार बरखास्त करावयास पाहिजे अशी आमची मागणी आहे.

डॉ.भागवत कराड : ते सरकार बरखास्त करण्याचा महापालिकेचा अधिकार होवू शकत नाही. केंद्र सरकारचा विषय आहे. स.सदस्यांनी आपआपली सुचना आपल्या मर्यादेपुरतीच मांडावी. जे बॉम्बस्फोटात मृत्यूमूखी पडले त्यांना श्रध्दाजंली अर्पण करावी.दहशदवाद करणारे जे असतील त्यांचा निषेध करावा.

मा.महापौर :ठिक आहे सर्वांनी श्रध्दाजंलीसाठी उभे रहावे.

याच वेळी दिल्लीत झालेल्या बाँबस्फोटातील मुत्यू पावलेल्यांना तसेच स्व.श्री.मोहनचंद शर्मा यांना सभागृहातर्फे दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

श्री.अ.रशिद खान मामु : ओरिसात चर्चवर हल्ले झाले,त्याचा निषेध करावा.

श्री.सतीष कटकटे :मा.महापालिका आयुक्त श्री.दिलीप बंड यांची विभागीय आयुक्त पदी नियुक्ती झाली त्याबध्दल त्यांचे सभागृहाच्या वतीने पुष्पगुच्छ देवून अभिनंदन करण्यात यावे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :याच बरोबर महापालिका विरोधी पक्षनेते पदी श्री.अश्रफ मोतीवाला तसेच चार वार्डातील निवडणुका होवून नवीन सदस्य निवडून आलेले आहे त्यांचेही पुष्पगुच्छ देवून स्वागत करावे.

श्री.संजय सिरसाट :मा.आयुक्त श्री.दिलीप बंड साहेब यांची विभागीय आयुक्त पदी नियुक्ती झालेली आहे याच बरोबर सभागृहनेते पदी स.श्री.गजानन बारवाल व नुकत्याच पार पडलेल्या महापालिकेच्या चार वार्डातील निवडणुकीत सदस्य निवडणूक आलेले आहे त्यांचही या सभागृहाच्या वतीने पुषगुच्छ देवून अभिनंदन करावे.नवनिर्वाचीत स.सदस्य यांनी स.सदस्य यांनी पक्षमतभेद बाजूला ठेवून शहराच्या विकासासाठी चांगले काम करावे अशी सभागृहाच्या वतीने अपेक्षा ठेवतो.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:नुकत्याच झाल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत महापालिकेसाठी शासनाने १०० कोटी दिले त्याबध्दल शासनाचेही अभिनंदन करावे.

श्री.रेणुकादास वैद्य :अभिनंदन करण्यास हरकत नाही परंतू मागिल वर्षीच्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्य शासनाने २००० कोटी मंजूर केले होते त्यापैकी १२० कोटीच मिळाले शासनाकडून पुर्ण निधी आल्यानंतर निश्चितपणे अभिनंदन करावे कुणाचेही दुमत असणार नाही.

श्री.सय्यद खुसरो :शहराचे आमदार व या राज्याचे मुख्यमंत्री यांचे अभिनंदन करण्यात यावे.

श्री.संजय सिरसाट :आताच नावे सुचविल्यानुसार अगोदर स्वागताचा कार्यक्रम घ्यावा त्यानंतर सभेच्या कामकाजास सुरूवात करावी.

श्री.अ.रशिद खान :शहराचे आमदार मा.श्री.राजेंद्रजी दर्डा साहेब यांचाही हा निधी मिळवून देण्यास मोठे सहकार्य लाभलेले आहे त्यांचाही सत्कार करण्यात यावा.

श्री.काशिनाथ कोकाटे :१००कोटीचा निधी या महापालिकेला देण्याचे मंत्रिमंडळाने जे राज्य शासनाने मान्य केले आहे. अभिनंदन करण्यात यावे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : हा निधी मिळविण्यासाठी महापालिकेची परीस्थिती मा.महापौर यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिली त्यांचे प्रयत्नाना यश आले त्याबध्दल मा.महापौर तसेच राज्य शासनाचा अभिनंदन ठराव पारीत करावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:यास माझे अनुमोदन आहे याच बरोबर मा.आयुक्त महापालिका यांनी या निधीसाठी सहकार्य केलेले आहे त्यांचाही सत्क्‍ार करण्यात यावा.

मा.महापौर :आताच स.सदस्यांनी नावे सुचवल्यानुसार त्यांचे सभागृहाच्या वतीने पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात येते.

याच वेळी मा.आयुक्त महापालिका श्री.दिलीप बंड या विभागीय आयुक्तपदी नियुक्ती झाल्याबध्दल तसेच सभागृहनेता पदी श्री.गजानन बारवाल व विरोधी पक्षनेते पदी श्री.अश्ररफ मोतीवाला व नुकत्याच पार पडलेल्या चार वार्डातील निवडणुकीमध्ये निवडुन आलेले चार स.सदस्य श्री.जेम्स बी अंबिलढगे,श्रीमती बनकर विजया संजय, श्री.अशोक गोरखनाथ विरकर व श्री.विनोद विठ्ठल सोनवणे या सर्वांचे मा.महापौरांचे हस्ते पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले.

श्री.अशोक विरकर :पुष्पगुच्छ देवून माझे स्वागत करणार आहे ते पुष्पगुच्छ आपण सर्वांनी एकत्रित येवून दिल्लीत झालेल्या बॉंबस्फोटात भारतीय २५ नागरीक मृत्यूमूखी पडले तसेच आंतकवादी यांचे सोबत लढा देतांना पोलीस निरीक्षक श्री. शर्मा यांचा मृत्यू झाला त्यांना पुष्पगुच्छ समर्पित करावे.

याच वेळी सभागृहात सर्वांचे वतीने पुष्पगुच्छ समर्पित करण्यात आले.

श्री अनिल जैस्वाल :अगोदर चर्चा घेण्यात यावी त्यानंतर विषय पत्रिकेला सुरूवात करावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :गुरू गोविंद सिंग गुरूतागद्दी संदर्भात आज जो सोहळा झाला त्याची निमंत्रण पत्रिका पदाधिकारी यांना दिली स. सदस्यांना दिलेली नाही.हे चुकीचे आहे स.सदस्यांना सुध्दा मिळावयास पाहिजे.पाच स्विकृत सदस्यांपैकी एका सदस्यांचे नाव आले स.सदस्य श्री. धिल्लन तरविंदरसिंग यांचे नाव आलेले नाही.ही पध्दत बरोबर नाही संबधीत अधिकारी यांना ताकीद दयावे यापूढे असे होवू नये.

मा.महापौर : ज्या भावना व्यक्त केली ती बरोबर आहे. महापालिकेच्या वतीने सर्वच स.सदस्यांना पत्रिका वितरीत करीत असतो हयाही पत्रिका वितरीत करण्यासाठी दिल्या होत्या परंतू त्या पोहचल्या नसल्याची जी भावना व्यक्ती केली यापूढे असे होवू नये प्रशासनाने काटेकोरपणे काळजी घ्यावी ज्या ज्या

विभागाचा संदर्भात कार्यक्रम असतो त्या त्या विभाग प्रमुखाने याची काळजी घ्यावी व वितरणाची स्वतः व्यवस्था करावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :निमंत्रण पत्रिका दिल्या होत्या परंतू आणखी काही नावे समावेश करायची होती म्हणून ऐनवेळी बदल झाला. ८ तासात बदल कळवावयास अवघड आहे. पुन्हा वेळ व वार मध्ये बदल करून वाटप केल्या आहे.

श्री.संजय सिरसाट : महापालिकेचा जोही कार्यक्रम असेल त्यासाठी जे कुणी प्रमुख पाहुणे उपस्थित ते उपस्थित राहण्यास तयार असतील तरच पत्रिकेत नाव यायला पाहिजे तसेच पाच पदाधिकारी वार्ड कार्यालयाचे सभापती व संबधीत वार्डाचे स.सदस्य यांचीच नावे पत्रिकेत असावेत.

श्री.अ.रशिद खान :शहरात अनेक ठिकाणी सुलभ शौच्छालय झाले त्याचे उद्घाटन होत नाही म्हणून सुरू केले नाही उद्घाटन करण्यास वेळ लागत असेल तर सुरू करावे.

श्री.सलीम खान :नवीन आयुक्त श्री. बंड साहेब यांनी अतिक्रमण मोहिम राबविली. मंदीर मस्जीद काढले जात होते शिवसेना भाजपा पक्षाचे लोक यावेळी गप्प बसले.यामूळे शहराचे वातावरण खराब झाले.

श्री.सतीष कटकटे :अगोदर चर्चा घेणार की विषय पत्रिका

श्री.अनिल जैस्वाल :अगोदर चर्चा घेण्यात यावी.

मा.महापौर :विषय पत्रिकेला सुरूवात करीत आहे. विषय क्र. २८४ वर बोलावे.

<u>विषय क्र. २८४ :</u>

दिनांक २०.०८.२००८ (१९-२९.०७.२००८ ची तहकुब) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

मा.महापौर : इतिवृत्त कायम करण्यासमंजूरी देण्यात येते.

<u>ठराव :</u>

दिनांक २०.०८.२००८(१९-२९.०७.२००८ ची तहकुब) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेस मान्यता देण्यांत आली.

<u>विषय क्र. २८५ :</u>

कार्यकारी अभियंता (ड्रेनेज,विद्युत,इमारती व उद्यान) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वार्ड क्र.२६ गणेश नगर अंतर्गत एन-८ भागातील ओंकार गॅस ते वेणूताई चव्हाण शाळेजवळील नाल्याचे पुनर्बांधकाम करणे या कामास मा.आयुक्त महोदय यांच्या मान्यतेनुसार कामाची निविदा कार्यवाही पुर्ण होऊन कामाचा कार्यादेश संबंधित एजन्सी श्री रत्नगुरू कन्स्ट्रक्शन औरंगाबाद यांना देण्यात आलेला आहे व त्या अनुषंगाने संबंधित एजन्सी मार्फत काम सुरू करण्यात आले होते. मात्र नुकतेच निघालेल्या मा.आयुक्त महोदय यांच्या आदेशाप्रमाणे काम पुढील आदेशापर्यंत थांबविण्यात आलेले आहे.

सदर कामाच्या तरतुदी अनुषंगाने मनपा अर्थसंकल्प २००८-२००९ मध्ये वार्ड ब मार्फत लेखा विभागास कामाची यादी तसेच,सी.डी.पुरविण्यात आलेली असून, त्यामध्ये सदर कामाचा समावेश आहे.परंतू मनपा अर्थसंकल्पात सदर कामाचे नांव समाविष्ट करण्याचे राहून गेल्याचे निदर्शनास आले आहे.याबाबत मुख्य लेखाधिकारी, मनपा यांना जा.क्र./मनपा/वार्डअभि.ब/९३८ दिनांक ११/०८/२००८ नुसार कळविण्यात आलेले आहे.

करीता, मनपा अर्थसंकल्प सन २००८-२००९ मध्ये नाला ट्रेनिंग या शिर्षकांतर्गत वार्ड क्र.२६ एन-८ भागातील ओंकार गॅस ते वेणुताई चव्हाण शाळेजवळील नाल्याचे पुनर्बांधकाम करणे या कामासाठी र.रू.११,०४,०००/- ची अर्थसंकल्पीय तरतुद उपलब्ध करून देण्यात यावी.

तथापी प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

संवाद :

मा.महापौर :मंजूरी देण्यात येते.

श्री.कचरू मोरे :ही रक्कम अर्थसंकल्पात मुख्य लेखाधिकारी यांचेकडून अनावधानाने समावेश करण्याचे राहून गेले असे म्हटले आहे. सध्या महापालिकेची आर्थीक परीस्थिती चांगली नाही. अनेक ठेकेदाराची बिले थांबलेली आहे. असे असतांना अवास्तव खर्चाचे असे ठराव का मंजूर करीत आहेत, ही रक्कम पुढील वर्षीच्या अर्थसंकल्पात समावेश करावी हा प्रस्ताव मंजूर करू नये.

श्री.गजानन बारवाल :मुळात हे काम किती रक्कमेचे होते काम थांबविण्याचे आदेश आहे असे वारंवार अधिकारी सांगत होते परंतु तसे आदेश मा.आयुक्तांनी दिलेले नव्हते नाल्याचे थांबविलेले काम आता पुन्हा सुरू करणार त्यासाठी रक्कम पाहिजे आहे नेमकी कामाची वस्तुस्थिती काय ? किती रक्कमेचे काम होते आणखी किती रक्कम लागणार आहे व त्या कामाची आवश्यकता आहे का ?

डॉ.भागवत कराड :या कामाचे ऑलरेडी टेंडर झालेले आहे मंजूरी दयावी.

श्री.हिम्मतराव दाभाडे :इतर वार्डातील विकास कामे निधि अभावी थांबविलेली आहे हा विषय मंजूर करू नये.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:कोणते काम कमी करून या कामासाठी निधी वळती करणार आहे. उल्लेख नाही. दुरूस्ती करायचे असेल तर दुरूस्त करा.

श्री.काशिनाथ कोकाटे :बजेट मध्ये या कामासाठी तरतूद होती आता स्पील ओव्हरमध्ये हे काम आहे.टेंडर होवून वर्क ऑर्डर सुध्दा झालेली आहे.

श्री.सय्यद खुसरो :मंजूर करण्यास आमचा विरोध आहे.

श्री.सलीम खान :इतर वार्डात १ लक्षचे काम होत नाही हे काम कसे करण्यात आले.

श्री.संजय जगताप :मंजूर करू नये. यास आमचा विरोध आहे.

याच वेळी मा.महापौर डायस समोर स.सदस्य मोठमोठयाने बोलतात.

डॉ.भागवत कराड :या कामाचे एजन्सी फिक्स झालेली आहे मंजूर करावे.

मा.महापौर :ऑलरेडी हा विषय यापूर्वी मंजूर झालेला आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:यास मंजूरी होती तर प्रस्ताव का ठेवला अगोदर मंजूरी झाली तेवढयाच रक्कमेत काम करून घ्यावे.

श्री.सतीष कटकटे :या विषयाची संपुर्ण माहिती घ्यावी.

श्री.अ.रशिद खान :प्रस्ताव बरोबर आहे पुन्हा कशासाठी दिला सविस्तर माहिती यात यायला पाहिजे होती शंका निर्माण होते.

श्री.सय्यद खुसरो :तरतूद होती तर मंजूरीसाठी का सादर केले. ५०हजार रक्कमेचे काम होत नाही असे १८-२० लक्षच्या कामाचे प्रस्ताव ठेवून मंजूरी करून घेत आहे हे बरोबर नाही. मनमानी करून असे प्रस्ताव येत असेल तर योग्य नाही खुलासा घेण्यात यावा.

मा.महापौर :ऑलरेडी हा विषय मंजूर केलेला आहे. जेंव्हा प्रस्ताव ठेवला जातो तो सविस्तर माहितीसह सभागृहात यायला पाहिजे याची प्रशासनाने दखल घ्यावी.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा अर्थसंकल्प सन २००८-२००९ मध्ये नाला ट्रेनिंग या शिर्षकांतर्गत वार्ड क्र.२६ एन-८ भागातील ओंकार गॅस ते वेणुताई चव्हाण शाळेजवळील नाल्याचे पुनर्बांधकाम करणे या कामासाठी र.रू.११,०४,०००/- ची अर्थसंकल्पीय तरतुद उपलब्ध करून देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. २८६ :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, किराडपूरा आझाद चौक ते राममंदिर पर्यंत २४ मी. डी.पी. रस्ता विकसीत करणे. या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २००७-०८ च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रक र.रू.६०,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर प्रस्ताव यापूर्वी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत सन २००२-०३ मध्ये तयार करणेचे काम हाती घेण्यात आले होते. परंतू रस्त्यात बाधीत असलेल्या मालमत्ता संपादित न झाल्यामुळे काम पूर्ण होवू शकले नाही. पाच वर्षापेक्षा जास्तीचा कालावधी झालेला असल्यामुळे आता सदर रस्त्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातर्फे होणे शक्य नाही. सध्या ३३० मी.लांब रस्ता डी.पी.प्रमाणे ताब्यात आहे व रस्त्याची परिस्थिती अत्यंत बिकट आहे. तसेच सिडको परिसरातील नागरीकांसाठी हा रस्ता मुख्य रहदारीचा असल्यामूळे विकसीत करणे अत्यंत आवश्यक आहे. सदर कामाचा खर्च सन २००८-०९ या आर्थिक वर्षात शहरी भागात नवीन डांबरी रस्ते या लेखाशिर्षात उपलब्ध असलेल्या र.रू.५०.०० लक्ष मधून करण्यात येणार आहे. उर्वरीत र.रू.१०.०० लक्षची तरतुद पुढील आर्थिक वर्षात उपलब्ध झाल्यानंतर खर्च करण्यात येणार आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी प्राप्त झालेली आहे.

तरी उपरोक्त रस्ता विकसीत करणेच्या र.रू.६०,००,०००/- च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

संवाद :

श्री.गजानन बारवाल :रस्ते विकास महामंडळामार्फत हा रस्ता पुर्ण होणार होता.काही मालमत्ता रस्त्यामध्ये बाधीत होत असल्यामूळे पाच वर्ष पूर्ण झाले रस्त्याचे काम होवू शकले नाही. बाधीत मालमत्ता संपादीत केल्या का? रस्ते विकास महामंडळ रस्ता का करित नाही. आपण का करावा.

श्री.कचरू मोरे :६० लक्ष खर्च अपेक्षीत आहे. हा खर्च करण्यासाठी महापालिकेची परीस्थिती तशी नाही. किराडपूरा ते आझाद चौक पर्यत रस्त्याचे काम करावे आझाद चौक ते राममंदिर पर्यत रस्ता चांगला आहे त्यामुळे रस्ते चांगला असतांना अवास्तव खर्च होवू नये.ठेकेदाराची बिले अदा केली जात नाही म्हणून विकास कामे थांबलेली आहे.याचाही विचार करावा.

श्री.निसार खान :यासाठी बजेट आहे का रोषणगेट किराडपूरा राममंदीर ते आझाद चौक रस्त्याचे काम करण्या संबधी यापूर्वी प्रश्न उपस्थित केला होता. परंतू अंदाजपत्रक तयार करतांना आझाद चौक पासून अलीकडील रस्ता घेतला रोषणगेट पासून पुढील घेतला नाही. रोषण गेट हे या भागातील सर्कल आहे.सन २००६-०७ मध्ये रोषणगेट सेंन्ट्रल नाका कटकट गेट पर्यत रस्त्याचे काम केले सन २००७-०८ मध्ये रोषणगेट ते चंपाचौक पर्यतच्या रस्त्याचे काम केले. अंदाजपत्रक तयार करतांना रोषणगेट किराडपूरा राममंदीर ते आझाद चौक पर्यतचे केले रोषणगेट जवळील रस्ता सोडून पूढील रस्त्याचे अंदाजपत्रक तयार केले. दुसरे असे की शरिफ कॉलनीची जागा चांद सुलताना बुढनखान व इतर यांचे नावाने होती महापालिकेने ती जागा भुसंपादीत केली आहे. तो स्पेस सोडून दिला पूढे जावून रस्त्याचे काम होत आहे. राममंदीर ते आझाद चौक पर्यतची जागाही दिनांक ९-३-१९९९ मध्ये नगररचना विभागाचे अधिका-यांनी पूर्ण मेंजरमेंन्ट करून ६२ गुंठे जमिन पुर्ण पंचनामा करून ताबा घेतला ४० गुंठे जमिनीची रजिस्ट्री करून घेतली व त्याचा मोबदलाही दिला कागदपत्रे आहेत. उर्वरीत २२ गुंठेचा मोबदला दिला नाही. शासनाच्या दराप्रमाणे जागेची किंमत १.३६ कोटी महापालिकेने फक्त ५७.२३ लक्ष रक्कम दिली. जे रस्त्याचे काम

करणार आहे रस्ता रूंदीकरण करतांना ज्यांची मालमत्ता बाधीत होत असेल त्यांना मोबदला दयावा त्यानंतर रस्ता रूंदीकरण व विकास करावा.

श्री.संजय जोशी :चर्चेवरून असे दिसते की,जागेचे भुंसपादन झाले नाही तर ठराव येतो कसा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:भुसंपादनाची कार्यवाही होवून ५७ लक्ष मोबदला दिला.उर्वरीत कार्यवाही चालू राहिल. या रस्त्याचे विकासाचे काम होणे आवश्यक आहे.५० लक्ष खर्च करण्याच्या कामास मंजुरी मिळालेली आहे. १० लक्षला मंजूरी दयायची आहे. या प्रस्तावास मंजूरी दयावी.

याचवेळी मा.आयुक्त श्री.दिलीप बंड साहेब सभागृहाच्या बाहेर जातात. उपआयुक्त महसूल त्याठिकाणी बसतात.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. महानगरपालिकेने भूसंपादनासाठी विशेष भूसंपादन अधिकारी यांचेकडे ११० कोटी पाठविलेले आहे. स.सदस्य श्री.निसारखान यांनी जो मुद्या मांडला जे की ६२ गुंठे जागा महापालिकेने ताब्यात घेतली ४० गुंठें जमिनीची खरेदीखत केले मोबदला दिला. उर्वरीत दिला नाही हा विषय वेगळा आहे नियमाने कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे.नियमानुसार मोबदला मिळावा. जो विषय समोर आलेला आहे त्यास मान्यता दयावी. जमीनीचा मोबदला बाकी असेल तर ते मंजूर करावे, डांबरीकरणाचे काम रोषनगेट पासून सुरू करावे.

श्री.सतीष कटकटे :प्रस्ताव कुणी सादर केला तसेच जागेचे भुसंपादन केले किंवा नाही याची पण माहिती घ्यावी सिल्लेखाना भागातील कब्रस्तानची जागा भुसंपादीत केली त्यासाठी बजेट मध्ये तरतूद होती यासाठी आहे का ?

मा.महापौर :हा विषय दुरूस्तीसह मंजूर करण्यात येतो.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, किराडपूरा आझाद चौक ते राममंदिर पर्यंत २४ मी. डी.पी. रस्ता विकसीत करणेच्या र.रू.६०,००,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, तसेच या रस्त्याने बाधित मिळकतींचा मोबदला देय होत असल्यास नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

चर्चा :

सौ.लता दलाल :या विषयाच्या अनुशंगाने सन २००८-०९ बजेट मध्ये किती कामे आहे.मागिल बजेटमधील किती कामे करायची बाकी आहे.कोणतीही विकास कामे करू नये असे प्रशासनाचे आदेश आहे असे अधिकारी वारवांर विचारणा केल्यानंतर उत्तर देतात सत्य परीस्थिती काय आहे खुलसा करण्यात यावा.प्रशासनाचे तसे आदेश नसेल तर वार्डातील जी जी कामे नमुद केलेली आहे त्या कामाचे लगेच अंदाजपत्रक तयार करून कामांना सुरूवात करावी. प्रशासनाने कामे बंद करण्याच्या सुचना दिल्या काय याचा खुलासा घेण्यात यावा. नसेल तर आमच्या प्रभागातीलही कामे व्हावी.

श्री.रेणुकादास वैद्य : या विषयाप्रमाणे यापुर्वी अनेक विषय मंजूर झालेले आहे. अनेक ठिकाणचे भुसंपादन केले मोबदला दिला्.जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही केली नाही. अनेक रस्त्यांचे कामाचे टेंडर झाले वर्क ऑर्डर दिल्या परंतू कामे झाली नाही. यापूर्वीचे रस्तेची कामे होण्यासाठी अगोदर लक्ष देण्याची गरज आहे.

श्री.संतोष खेंडके :गजानन महाराज मंदीर चौक ते जयभवानीनगर चौकापर्यतच्या रस्त्याचे काम रस्ते विकास महामंडळामार्फत चालू होते सहा महिण्यापासून काम बंद आहे रस्त्याच्या एक साईडचे काम अर्धवट आहे. केंव्हा चालू करणार आहे खुलासा घेण्यात यावा.

मा.महापौर :हा विषय मंजूर केलेला आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :मागिल वर्षाचे विकास कामे पुर्ण झालेली नाही ती अगोदर पुर्ण करावी जे प्रत्येक वार्डात १० लक्षचे कामे करणार असे पत्र आयुक्तांनी दिले स्पील ओव्हरची कामे अगोदर करावी नंतर ही कामे करावे.

श्री.रेणुकादास वैद्य :नेहमीप्रमाणे वसूली होते आवक चागंली आहे. असे असतांना तिजोरीत खडखडाट कसा होतो. १० लक्षची कामे मंजूर करून देवू असे म्हटले हा आयुक्तांचा अधिकार नव्हे. जमेची बाजू कमी झालेली नाही त्यामूळे जी कामे मंजूर झालेली आहे टेंडर झालेले आहे वर्क ऑर्डर झालेल्या आहे अशी कामे त्वरीत करण्याच्या सुचना देण्यात याव्यात.

श्री.विनोद सोनवणे :शिवाजीनगर भागासाठी दोन वेळेस बजेटमध्ये ५०-५० असे एक कोटी रूपये ठेवलेले होते १५ वर्ष झाले कोणताही विकास या भागात झालेला नाही.

मा.महापौर :विषय क्र. २८६ च्या संबधीत नाही. आपण खाली बसावे.

श्री.गजानन बारवाल :एकदम स.सदस्यांना असे बोलणे बरोबर नाही. ते नवीन सदस्य आहे पहिल्यांदा त्यांचे मत मांडण्यासाठी उभे होते.त्यांचे भावना समजून घ्याव्यात त्यांना त्यांचे मत माडू दयावे.

याचवेळी मा.महापौर डायस समोर अनेक स.सदस्य मोठमोठयाने बोलत असतात.

श्री.विनोद सोनवणे :शिवाजीनगर भागात ५० लक्षची तरतूद ठेवलेली आहे विकास कामे केंव्हा सुरू करणार आहे.

श्री.गजानन बारवाल : नविन सदस्य आपल्य भावना व्यक्त करित होते. त्यावेळी स.सदस्य श्री.अनिल जैस्वाल भावनावश होवून बोलले.

मा.महापौर :सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे.मा.आयुक्त यांनी शिवाजीनगर भागातील कामे का सुरू होत नाही तसेच विकास कामे बंद ठेवावी असे आदेश प्रशासनाने दिलेले आहे का खुलासा करावा.

मा.उपआयुक्त(म) :नवीन कोणतेही कामे करू नये असे प्रशासनाने आदेश काढलेले नाही.

श्री.हिम्मतराव दाभाडे :आदेश नाही तर विकास कामे का थांबविण्यात आलेली आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :नवीन बजेटमधील कामे अदयाप सुरू केलेली नाही मागिल वर्षातील स्पील ओव्हरची कामे करणे बाकी आहे. वर्क ऑर्डर झालेली असतांना त्याच परीस्थितीत कामे थांबविली जे की महापालिकेकडे त्या कामासाठी निधी उपलब्ध नाही असे कारण सांगितले जाते. स्पील ओव्हरची कामे सुरू केल्यास प्रत्येक वार्डात कामे होतील.माझे वार्डातील ही ४-५ कामे आहे १० लक्षची कामे करण्याचे सुचविले हे बरोबर नाही वसुली होत नसेल तर ती प्रशासनाने करावी व वार्डात विकास कामे कशी होतील याकडे लक्ष दयावे.

सौ.लता दलाल :जकात व इतर वसुली नियमीत होत आहे कामे बंद करण्याचे आदेश प्रशासनाने दिले नाही अधिकारी आदेश असल्याचे खोटे का बोलतात.स्पील ओव्हरची कामे का बंद केली.कुणाच्या सांगण्यावरून केली याचा खुलसा देण्यात यावा १० लक्ष पर्यतच कामे होती असे पत्र कुणी व कशासाठी काढले.याचा खुलासा दयावा.

श्री.रेणुकादास वैद्य :वसुली कमी झालेली नसतांना कामे का थांबविली. स्पील ओव्हरची कामे होणार की नाही. १० लक्ष पर्यतची कामे प्रत्येक वार्डात होणार असे पत्र मा.आयुक्तांनी दिले. याचा अर्थ काय संपूर्ण खुलासा करावा.

श्री.अनिल जैस्वाल :वार्ड क्र. १९ मध्ये आंबेडकर चौक ते बळीराम पाटील शाळेपर्यत एका ठेकेदाराने सहा महिण्यापूर्वी फुटपॉथचे काम घेतले अदयाप पूर्ण केले नाही.लोकांच्या घरासमोर मटेरियल आणून टाकले आता काम बंद केले.

नागरीकांना जा-ये करण्यासाठी त्रास होत आहे.विकास कामे बंद केल्याची अधिकारी चुकीची माहिती देत असेल तर कार्यवाही करावी.

श्रीमती कला बोरामणीकर:माझे वार्डात तीन कामे चालू आहे. ती अर्धवट ठेवली. मटेरियल चोरी होत आहे. निदर्शनास आणून दिले तर कामे बंद करण्याचे आदेश आहे असे उत्तर मिळते. सत्य काय आहे चुकीची माहिती देणारे अधिकारी यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.वसंत नरवडे : आपला अधिकारी यांचेवर अंकूश नाही. विभाग प्रमुख यांना कामाची जबाबदारी तसेच काय काम आहे याची माहिती नसते. नवीन १० लक्षची कामे होतील असे पत्र सदस्यांना दिलेले आहे. आताच खुलासा झाला प्रशासनाने कामे बंद करण्याचे कुठलेही आदेश दिले नाही.अधिकारी विकास कामे करण्यास अडथळा निर्माण करीत आहे. निधी नसेल तर तसा व कोणती कामे करायची व करणे आवश्यक आहे. नवीन बजेटमधून हे काम करणार मोठी रक्कम आहे दुसरीकडे १० लक्ष पर्यत कामे होतील म्हणून सदस्यांना पत्र दिले जाते हे योग्य नाही.४ लक्षचे कामे मंजूर केली नाही ज्याचे वर्क ऑर्डर दिल्या ते स्थगित केले.प्रत्येक कार्य.अभियंता यांचेकडून आलेल्या, दिलेल्या व राहिलेल्या कामाची यादी घ्यावी आपण यात लक्ष घालावे. स्पील ओव्हरची कामे बंद केली वर्क ऑर्डर झाल्या ठेकेदारांना बिले दिली जात नाही. पुढील महिण्यात जकात वसुली बंद होवून उपकर लागू होणार आणखी बिकट परीस्थिती होवू शकेल. डिसे-जानेवारीत पुन्हा नवीन बजेट येणार नवीन कामे केंव्हा करणार याचाही विचार करावा.वसुली करण्यासाठी ताकीद देवून जी कामे थांबविलेली आहे ती तात्काळ चालू करण्याचे आदेश करावे.

श्री.हिम्मतराव दाभाडे :माझे वार्डात सन२००६-०७ या वर्षातील बजेट मध्ये कामे होती पुन्हा सन २००८-०९ च्या बजेट मध्ये आली परंतू ती कामे करता येत नाही असे अधिकारी सांगतात.त्यासाठी शासनाकडून येणार निधी व प्रशासनाकडील असलेला निधी जी कामे थांबविलेली असेल ती पुर्ववत सुरू करावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: १० लक्ष पर्यत वार्डात कामे करू असे पत्र मा.आयुक्तांनी सदस्यांना दिले. वसुली चांगली झाल्यास ३०-४० लक्ष पर्यत कामे होतील असे आश्वासन देवून कार्यवाही करावी. या प्रस्तावातील रक्कम कोणत्या कामातून खर्च करणार आहे.

श्री.संतोष खेंडके :दरवर्षी प्रमाणे जकात वसुली व मालमत्ता कर व इतर वसुली व्यवस्थीत होत असतांना १० लक्ष पर्यतच विकास कामे करण्याचे प्रशासन पत्र देवून कळवितात.वसुली करण्याचे काम हे प्रशासनाचे आहे विकास कामात कुणी खोडा आणू नये. जाणून बूजून कुणी विकास कामात राजकारण करीत असेल तर हे योग्य नाही.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:राजकारण प्रशासन करीत नाही आपण करीत आहात.यापूर्वी बीओटीचे प्रस्ताव मंजूर केले खर्च झाला. परीस्थिती त्यामूळे खालावली दोन महिण्यात मा.आयुक्त आल्यापासून व्यवस्थीत नियोजन करण्याचे काम करीत आहे कोणकोणती कामे करायची आहे. यासाठी एक कमेटी करावी पॉलीसी निर्णय घ्यावा प्रशासनाने सत्य परीस्थिती समोर आणली.आरोप प्रत्यारोप करणे योग्य नाही.

श्री.प्रल्हाद निमंगावकर :१० लक्षची कामे कोणत्या बजेटमधील करणार आहे. मागिल वर्षीच्या बजेटमधील माझे वार्डातील २५ लक्षची कामे करणे बाकी आहे.

श्री.शंशाक विसपुते :गुंठेवारीतील रक्कम नागरीकांनी जमा केलेली असते त्याच भागातील वापरली गेली पाहिजे अशा निधीतून अनेक भागात कामाचे टेंडर होवून ४-४ महिणे झाले वर्क ऑर्डर काढल्या नाही किमंतीत वाढ झाल्याने ठेकेदार काम करण्यास तयार नाही गुंठेवारी भागातील विकास कामे मार्गी लागतील असे मा.आयुक्त यांनी मागिल बैठकीत म्हटले होते. गुंठेवारी रेग्यूलर करण्यासाठी कर्मचारीच दिसून येत नाही पहिले चलन भरणा करून एक ते दीड वर्ष झाले दुसरे चलन दिले जात नाही. यामूळे नागरीकांना त्रास होतो. जे अधिका-यांना भेटतात त्यांचीच कामे होत आहे.सर्व माहिती घेवून संचिका मंजूर करण्यासाठी कार्यवाही करावी. सर्वीस चार्ज १५ टक्के मागणी होते त्यामूळे ८-८ ते १०-१० कामे प्रलंबीत आहे. गुंठेवारी भागातील कामे करण्यास प्रशासनाला अडचण नाही अशी कामे करण्याचे आदेशीत करावे.

श्री.संतोष खेंडके : गुंठेवारी भागातील जमा होणारी रक्कम लोकवर्गणीतून झालेली असते याचा बजेटशी संबध येत नाही त्या त्या भागात नागरीकाच्या मागणीनुसार आवश्यक ते कामे करण्यात यावी.मागिल बैठकीच्या वेळी हा मुद्या मांडला होता.

श्री.प्रल्हांद निमंगावकर :मल्हार चौक ते तिरूपती व्यायाम शाळा पर्यत पावसाच्या पाण्याने नागरीकांना त्रास होतो २० लक्ष रक्मम बजेटमध्ये ठेवलेली होती तीन वेळेस टैंडर झाले काम घेण्यास तयार नाही. मा.आयुक्त यांनी तेथे पाहणी केली व तातडीने काम करण्याचे आदेश केले होते.टेंडर झाले लोक घेण्यास तयार नाही सरस्वतीनगर भागात ड्रेनेजचे पाणी लोकांच्या घरात जाते.हा प्रश्न तीन वार्डाशी संबधीत येतो संबधीत अधिकारी याचेकडून माहिती घेवून हा प्रश्न सोडवावा.

श्री.शशांक विसपुते :हा तीन वार्डाचा प्रश्न आहे नाल्याचे पाणी पावसाळयात लोकांच्या घरात जाते. मा.आयुक्त व श्री. पानझडे साहेब यांनी पाहणी केली परंतू अदयाप काम मार्गी लागले नाही.

डॉ.भागवत कराड :अनेक वार्डात कामे होत नाही. मागिल वर्षातील अनेक कामे स्पील ओव्हरमध्ये आहे.टेंडर झाले वर्क ऑर्डर झाल्या परंतू कामे होत नाही. ती कामे अगोदर करावी त्यानंतर जे मा.आयुक्तांनी पत्र देवून १० लक्षची प्रत्येक वार्डात कामे करण्याचे सुंचविले ती करावी.आताच म्हटल्या प्रमाणे लोकांच्या घरात पावसाचे पाणी जाते पावसाळयात लोकांच्या घरात पाणी जाते त्यासाठी उपाययोजना करण्याचे आदेशीत करावे.

श्री.गजानन बारवाल : सभागृहात बरीच चर्चा झाली. सर्वांचे म्हणणे आहे, काम होत नाही. अनेक कामाचे टेंडर होते वर्क ऑर्डरसाठी येते लेखा विभागातून शेरे येतात कामे थांबविली जातात हे चूकीचे आहे. लेखा विभागात ज्या ज्या संचिका थांबविल्या जातात त्याबद्दल आदेश द्यावेत. स्पील ओव्हरची संपूर्ण कामे चालू करण्यात यावी. कामांची गरज आहे का. याची दखल घेण्यात यावी. स्पील ओव्हरची कामे मंजूर ते सुरू करावे व नंतर १० लाखांची कामे घ्यावी.

श्री.मोहन मेघावाले :माझे वार्डात उदयानच्या संरक्षित भिंतींचे काम चांगल्या प्रतीचे झालेले नसून अर्धवट आहे बिल देण्यात आले. पावसामूळे पडझड झाली.थर्ड पार्टी इन्स्पेक्शन ठेवून त्या कामाची चौकशी व्हावी. सभा संपल्यावर सोबत चलून पाहणी करावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:६० कोटीची डिफर पेमेंन्टवर कामे दिली २० टक्के रक्कम ॲडव्हॉन्स व उर्वरीत टप्प्या टप्प्याने दयायची होती.२० टक्के बजेटमधीलच खर्च केला

त्यामूळे आता इतर विकास कामे होंत नाही कोणती कामे करणे गरजेचे आहे अर्धवट आहे याचा व १० लक्षची नवीन बजेटनुसार कोणती कामे करायची याचा एकत्रित प्रस्ताव मा.आयुक्ताकडे सादर करून कार्यवाही करावी. ज्यामूळे सर्व वार्डात विकास कामे होतील.

श्री.संतोष खेंडके :आनंत अवदूत अपार्टमेंन्ट मध्ये शिवानी काळंम पाटील ही मुलगी डेग्यूच्या आजाराने ग्रस्त आहे अशा प्रकारचे रूग्ण या शहरात होवू नये याची गांभीर्याने दखल घेणे गरजेचे आहे स.स.श्री.निमगांवकर यांनी जी सुचना मांडली ते काम तातडीने करावे.

मा.महापौर :वार्डातील विकास कामे थांबलेली चालू करण्यासाठी प्रशासनाने कार्यवाही केलेली दिसून येत नाही.उत्पन्नाची जी आवक आहे ती नेहमीप्रमाणे होत आहे.तरी सुध्दा विकास कामे का थांबलेली आहे विकास कामे कशी सुरू होतील यासाठी मा.आयुक्त,तीनही कार्य.अभियंता तसेच मुख्यलेखाधिकारी यांनी एकत्रित येवून येणारी आवक व करावयाची विकास कामे यांची सांगड घालून त्वरीत विकास कामे सुरू करावी. स्पील ओव्हरची टेंडर वर्क ऑर्डर झालेली कामे सर्व वार्डातील प्रशासनाने त्वरीत सुरू करावी कामे थांबविण्या बाबत जे काही आदेश काढले ते अत्यंत चुकीचे आहे यानंतर १० लक्षची प्रत्येक वार्डात जी कामे करावयाची त्या कामाचे अंदाजपत्रक करण्यास सुरूवात करावी हा विषय अत्यंत गार्भीर्याने घेवून हे काम प्रशासनाने त्वरीत हाती घ्यावे.

श्री.अ.रशिद खान :ठेकेदाराने कामे घेतली २ टक्के अनामत रक्कम भरणा करीत नाही कामे सुरू करीत नाही. त्यांना काळया यादीत समावेश करावा.

मा.महापौर :अनेक ठेकेदारांनी जास्तीची कामे घेतली आता सुरू करण्यासाठी कारणे सांगतात ज्यांनी २ टक्के अनामत रक्कम भरणा केली नाही त्यांना ताबडतोब ब्लॅक लिस्ट करण्यात यावे. स.सदस्य श्री.निमंगावकर यांनी पोटतिडकिने त्यांचे वार्डातील विकास कामाचा मुद्या मांडला ते काम तातडीने करण्यात यावे. शिवाजीनगर भागात विकास बजेटमध्ये ५० लक्षची तरतूद आहे.स.सदस्यांशी विचार विनीमय करून व इतर वार्डातील स.सदस्यांनी सुध्दा आपआपल्या वार्डात कोणते काम करणे आवश्यक आहे त्यास प्राधान्य देवून त्या त्या कामाची डिमांन्स संबधीत विभागाकडे दयाव्यात वार्ड १५ मध्ये सरंक्षित भिंतीचे काम चांगल्या प्रतीचे झालेले नाही असे मत आताच स.सदस्यांनी मांडले ते ही अर्धवट झालेले आहे किंवा काय याची संबधीत अधिकारी यांनी माझेकडे सविस्तर माहितीसह अहवाल दयावा.

श्री.अशोक विरकर :सिडकोतील वार्ड क्र. ४९ सह तीन वार्डातील खाजगी एजन्सी साफसाईचे काम करते ३२ कामगार आहे. वार्डाचे क्षेत्रफळ हे ५ कि.मीटरच्या आसपास आहे एवढया कमी कामगारामध्ये संपूर्ण वार्डाची साफसफाई व्यवस्थीत होत नसून पावसाच्या पाण्याचे अनेक ठिकाणी कचरा कुजलेला दिसून येतो घाणीचे साम्राज्य पसरलेले असून माझ्या वार्डात दोन डेंग्यूचे रूग्ण आहेत आवश्यक विकास कामे केंव्हा सुरू करणार आहे माहिती घ्यावी. स्वच्छतेकडे लक्ष दयावे. तसे प्रशासनाला आदेशीत करावे.

श्रीमती रजनी जोशी : सिडको भागात व्यवस्थीत साफसफाईचे काम होत नाही पुर्वीच्या एजन्सीलाच काम दिल्याचे समजते त्यांना देवू नये यात आपण स्वतः लक्ष घालून तसेच विकास कामे सुरू करण्याचे प्रशासनास आदेशीत करावे.

श्री.सय्यद खुसरो :कार्यालयाकडून अधिका-याना मोबाईल देण्यात आले. श्री.एम एम खान नगररचना विभागात कार्यरत असून त्याचा मोबाईल नेहमी बंद असतो. तास अर्धातास चालू ठेवून बंद करतात. कार्यवाही करावी.माझे वार्डात स्लम भागातून पावसाचे पाणी मस्जीद मंदीर मध्ये जात आहे. एक ४० लक्षचे काम आहे इतर भागात मोठया रक्कमेची कामे होत आहे हे काम का होत नाही संबधीत अधिकारी यांचेकडून खुलासा घेण्यात यावा.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :श्री.एम एम खान यांची बदली करावी म्हणून स्थायी समिती निर्णय घेतला बदली का होत नाही.

मा.महापौर : अनेक कामे होत नाही. गुंठेवारी भागातील जमा होणारी रक्मम व महापालिकेचे बजेट याचा संबध येत नाही त्यामूळे तेथील विकास कामे त्वरीत सुरू करावी. डेग्युचे काही रूग्ण आढळले या भागात स्वच्छता तसेच औषध फवारणी करावी शहरात असे साथीचे आजार होणार नाही याची आरोग्य विभागाने दखल घ्यावी पावसाळयाचे दिवस असून आपतकालीन सेवा सुरू केली या कालावधीत २४ तास अधिकारी यांनी कामासाठी सज्ज असायला पाहिजे कार्यालयाने अधिकारी /कर्मचारी यांना मोबाईल सेवा दिलेली आहे. यापूढे यातील ज्यांचे मोबाईल सेवा बंद असेल त्या त्या अधिकारी कर्मचारी यांचेवर प्रशासनाने कार्यवाही करावी.

श्री.अनिल जैस्वाल :वार्ड १९ मध्ये गेल्या तीन वर्षापासून औषध फवारणी होत नाही असे असतांना बिल अदा करण्यात आले. हे कसे होवू शकते.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:डायरेक्ट कार्यवाही करणे योग्य नाही पॉलीसी डिसीजन घ्यावे सकाळी १० ते सायं. ६ वा.वाजेपर्यत मोबाईल बंद ठेवू नये लेखी आदेश देण्याचे आदेशीत करावे व स.सदस्यांचे मोबाईल घेण्याचे सुचना कराव्यात त्यानंतर जे अधिकारी मोबाईल बंद ठेवतील त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.संतोष खेंडके :दिं.२-९-२००८ च्या एका वृत्तपत्रात सिल्लेखाना भागातून ड्रेनेज लाईन मधून रक्त वाहते आज मी प्रत्यक्ष बघीतले तेथे जनावरे बांधलेली होती. संबधीत विभागाने काय कार्यवाही केली आहे.

मा.महापौर :संबधीत विभागाने याची दखल घ्यावी.

श्री.गजानन बारवाल :विषय पत्रिका घेण्यात यावी. विषय पत्रिकेनंतर चर्चा घ्यावी.

<u>विषय क्र. २८७ :</u>

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे शुध्दीकरण प्रक्रीयेत आवश्यक असणाऱ्या ब्लिचींग पावडर ग्रेड-१ च्या सन २००८-०९ या वर्षाच्या पुरवठया साठीचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या सन २००७-०८च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले आहे. वार्षीक पुरवठयाची अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ३२,४९,०००/- इतकी आहे.

आर्थिक वर्ष २००८-०९ च्या अर्थसंकल्पात पाणीपुरवठा रसायण खरेदी करीता एकत्रित तरतुद करण्यात आलेली आहे. करीता वर्ष २००८-०९ मधील वार्षीक ब्लिचींग पावडर ग्रेड-१ च्या पुरवठयाची रक्कम रूपये ३२,४९,०००/- चे अंदाजपत्रक मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

<u>ठराव :</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे शुध्दीकरण प्रक्रीयेत आवश्यक असणाऱ्या ब्लिचींग पावडर ग्रेड-१ च्या सन २००८-०९ या

वर्षाच्या पुरवठयासाठीचे रक्कम रूपये ३२,४९,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. २८८ :

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद पाणीपुरवठा योजने अंतर्गत फारोळा जलशुध्दीकरण केंद्र येथे जलशुध्दीकरण प्रक्रीयेत आवश्यक असणाऱ्या तुरटी ग्रेड-१ चा पुरवठा करण्यासाठीचे अंदाजपत्रक रक्कम रू.२१,००,०००/- चे तयार करण्यात आले होते. त्यास मा.सर्वसाधारण सभेने दि.१९.०३.२००८ रोजी विषय क्र.१९२ अन्वये मंजुरी प्रदान केली होती. मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीनुसार ई.निविदा विभागातर्फे निविदा कार्यवाही करण्यात आली असता दर भरलेली मे.सार्क केमीकल्स यांची एकच निविदा प्राप्त झाली. मे.सार्क केमीकल्स यांनी तुरटी ग्रेड-१ च्या पुरवठयाकरीता रू.९७४१/- प्र.मे.टन इतका दर दाखल केला होता. या दराने निविदेची किंमत ही रूपये ६८,१८,७००/- इतकी येत होती. जी अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ३२४.७०% इतकी जास्त येते.

राज्यातील इतर महानगरपालिका, (पुणे,पिंपरी चिंचवड,मुंबई,कोल्हापूर) सद्यस्थितीत जलशुध्दीकरण प्रक्रियेत तुरटी ऐवजी पी.ए.सी.पावडर (Poly-Aluminium-Chloride) चा वापर करतात. पी.ए.सी. पावडर व तुरटीच्या तुलनेत १/४ ते १/५ इतकीच वापरावी लागते. त्यामुळे तुरटी ऐवजी पी.ए.सी.पावडर खरेदी केल्यास महानगरपालिकेची आर्थिक बचत होईल. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या दरसुचीमध्ये PAC पावडरचे दर उपलब्ध नसल्यामुळे राज्यातील इतर महानगरपालिकांकडे दराबाबत विचारणा केली असता पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून दर प्राप्त झाले. प्राप्त दरांनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन अंदाजपत्रकीय र.रू.४४,३१,०००/- इतकी आहे.

आर्थिक वर्ष २००८-०९ च्या अर्थसंकल्पात पाणीपुरवठा रसायन खरेदी करीता एकत्रित तरतुद करण्यात आली आहे. करीता सन २००८-०९ या वर्षाकरीता तुरटी ग्रेड-१ ऐवजी पी.ए.सी. पावडरचा पुरवठा करण्याचे अंदाजपत्रक र.रू.४४,३१,०००/- चे मा.सर्वसाधारण सभेपुढे विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

संवाद :

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:पुर्वीची २१ लक्ष व आताची ४४.३१ लक्ष ही कॉन्टेटी सारखीच येते का? यांचे व्हेरीफिकेशन करावे.

मा.महापौर :संबधीत अधिकारी यांनी या बाबत खुलासा करावा.

कार्य.अभियंता(पापू) :२१ लक्षचे अंदाजपत्रक तयार करून निविदा काढण्यात आली होती.मार्केट मध्ये रॉमटेरियलचे दर वाढल्यामूळे ३२४ टक्के अबाऊ आली त्याची किमंत ६८.१८लक्ष होत होती. दरम्यानच्या काळात मा.आयुक्त यांनी निर्देश दिल्याप्रमाणे इतर महापालिकामध्ये तुरटी ग्रेड-१ ऐवजी पीएमसी पावडर हे नवीन केमीकल वापरले जाते जे जास्त इफेक्टियूव्ह आहे त्यामूळे महापालिकेची सेव्हींग सुध्दा होवू शकते.त्याची डीएसआरला किमत नसल्यामूळे इतर महापालिकेमधील दर घेवून त्या अदांजपत्रक मंजूरीसाठी सादर केले. मंजूरी मिळाल्यास पुढील कार्यवाही होईल.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:२१ लक्षचे ४४ लक्ष कशामूळे वाढत आहे जी रक्कम वाढत आहे वाढीव रक्कम बजेट मध्ये तरतूद केलेली आहे का कोणत्या हेड मधून मर्ज करणार आहे खूलासा करावा.

डॉ.भागवत कराड :पीएससी पावडर खरेदी करणार आहे अंदाजीत रेट घेतलेले आहे. टेंडर निघेल जे रेट येतील त्यानुसार मान्य होतील आता अंदाजपत्रकास मान्यता दयायची आहे.

कार्य.अभियंता (पापू) : रसायन खरेदीसाठी एकत्र ब्लॉक बजेट ठेवलेले आहे. तरतूद उपलब्ध आहे त्यानुसार सादर केले आहे.

मा.महापौर :यास मंजूरी देण्यात येते.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणीपुरवठा योजने अंतर्गत फारोळा जलशुध्दीकरण केंद्र येथे जलशुध्दीकरण प्रक्रीयेत तुरटी ऐवजी पी.ए.सी.पावडर (Poly-Aluminium-Chloride) चा वापर करणेस मान्यता देण्यांत येते. सन २००८-०९ या वर्षाकरीता तुरटी ग्रेड-१ ऐवजी पी.ए.सी. पावडरचा पुरवठा करण्याचे रक्कम रू.४४,३१,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. २८९ :

कार्यकारी अभियंता (ड्रे.वि.उ.व ई) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मा.स.नगरसेवक श्री.जावेद कुरैशी वार्ड क्र.२९ यांनी दि.१०/०७/२००८ रोजी लेखाशिर्ष बद्दला बाबत पत्र दिलेले आहे. मागणी नुसार खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहे. वार्ड क्र.२९ मनपा शाळेजवळील संरक्षित भिंत बांधणे व इतर कामे करणे र.रू.५ लक्ष पान क्र.Wsc ०९ वर नमुद (अर्थसंकल्प पुस्तिका सन २००८-०९ च्या) या कामाऐवजी खालील प्रमाणे लेखाशिर्षक बदल वार्ड क्र.२९ अंतर्गत कॉंक्रेटींग करणे/दुरूस्ती करणे/पेव्हर ब्लॉक बसविणे/दुरूस्ती करणे/ड्रेनेज लाईन दुरूस्ती/गटार दुरूस्ती करणे,फरशी दुरूस्ती करणे,(रक्कम रूपये ३००० ते २५००० पर्यंत) साठी वार्ड कार्यालय क जाफरगेट येथे वळती करणे.

उपरोक्त प्रमाणे लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर : विषय मंजूर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२९ मनपा शाळेजवळील संरक्षित भिंत बांधणे व इतर कामे करणे र.रू.५ लक्ष पान क्र.Wsc ०९ वर नमुद (अर्थसंकल्प पुस्तिका सन २००८-०९ च्या) या कामाऐवजी वार्ड क्र.२९ अंतर्गत कॉंक्रेटींग करणे/दुरूस्ती करणे/पेव्हर ब्लॉक बसविणे/दुरूस्ती करणे/ड्रेनेज लाईन दुरूस्ती/गटार दुरूस्ती करणे,फरशी दुरूस्ती करणे,(रक्कम रूपये ३००० ते २५००० पर्यंत) साठी वार्ड कार्यालय क जाफरगेट येथे वळती करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. २९० :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.६४ मधील न्यु उस्मानपुरा येथील श्री.मोहन गोविंद चौधरी यांचे घर ते श्री.निलंगेकर यांच्या घरापर्यंत जाणाऱ्या रस्त्याला (संत एकनाथ रंग मंदिर मागचा रोड) कै.दादा बापट मार्ग असे नामकरण करण्यात यावे या भागातील नागरीकांचे मागणीनुसार न्यु उस्मानपुरा येथील श्री.मोहन गोविंद चौधरी यांचे घर ते श्री.निलंगेकर यांच्या घरापर्यंत जाणाऱ्या रस्त्याला (संत एकनाथ रंगमंदिर मागचा रोड) कै.दादा बापट मार्ग असे नामकरण करणे संबंधीचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.रेणुकादास (राजु) वैद्य अनुमोदक :श्री.विनायक पांडे

मा.महापौर : विषय मंजूर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.६४ मधील न्यु उस्मानपुरा येथील श्री.मोहन गोविंद चौधरी यांचे घर ते श्री.निलंगेकर यांच्या घरापर्यंत जाणाऱ्या रस्त्याला (संत एकनाथ रंग मंदिर मागचा रोड) कै.दादा बापट मार्ग असे नामकरण करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. २९१ :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र.७८ येथील महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रास या वार्डातील नगरसेवक कैलासवासी साहेबरावजी राणुजी कावडे असे नाव देण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सविनय सादर.

सुचक : श्री.रवि साहेबरावजी कावडे

अनुमोदक :श्री.प्रकाश अत्तरदे, श्री.संजु रिडलॉन, श्री.मधुकर सावंत

मा.महापौर : विषय मंजूर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७८ येथील महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रास या वार्डातील कैलासवासी साहेबरावजी राणुजी कावडे असे नाव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. २९२ :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सर्वसाधारण सभा दिनांक १६.०२.२००८ विषय क्रमांक - १३० अन्वये दिनांक ०१.०४.२००८ पासून थकीत मालमत्ता व पाणीपट्टी करावर १२% विलंब शुल्क आकारणेस मान्यता दिलेली असून, सर्वसामान्य मालमत्ता धारकास थकीत रक्कमेचा कर भरणा करण्यासाठी संधी मिळावी म्हणून नागरीकांच्या सोयीसाठी **अभय योजना** अंतर्गत थकीत मालमत्ता व पाणीपट्टी करावर विलंब शुल्क आकारणी दिनांक ०१.०९.२००८ पासून करणे बाबत सर्वसाधारण सभेने दिनांक २०.०८.२००८ रोजी मान्यता दिलेली आहे.

सदरील योजनेस नागरीकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यामूळे जास्तीत जास्त नागरीकांना अभय योजनेचा लाभ घेता यावा म्हणून ३० नोव्हेबंर २००८ पर्यंत या योजनेस मुदतवाढ देण्यात यावी. यापूर्वी दिनांक ०१.०४.२००८ पासून वसूल करण्यात आलेला (वसूल केला असल्यास) विलंब शुल्क पूढील वर्षीच्या मालमत्ता/पाणीपट्टी करात समायोजीत करण्यात यावा.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक :०१.श्री.संतोष जेजुरकर,०२.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार,०३.श्री.अशरफ युनूस मोतीवाला

अनुमोदक : ०१. डॉ.श्री.भागवत कराड,०२.श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर,०३.श्री.अब्दुल रशिद खान (मामु), ०४. श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय

संवाद :

श्री.गजानन बारवाल :ज्यांचेकडे पाच वर्षापेक्षा जास्त वर्षाची थकबाकी असेल त्यांना विलंब शुल्क १२ टक्के व्याज लावणे निश्चित योग्य होईल.यामूळे नागरीकावर वचक बसला नागरीक कर भरणा करीत आहे. परंतू रेग्युलरला लावू नये. परंतु अशी कार्यवाही प्रतिनिधी म्हणून आपण करणे योग्य होणार नाही

श्री.अ.रशिद खान :जेव्हा ठराव पारीत केला त्यावेळी यावर चर्चा झाली नाही आपण मंजूर मंजूर म्हणून लगेच उठून उभे राहिलात सभा संपवीली होती.सभांसपली होती. १२ टक्के व्याज लावणे नियमाने बरोबर नाही लावू शकत नाही. ते रद्द करावे.

श्री.गजानन बारवाल :ज्यांचेकडे पाच वर्षापासूनची थंकबाकी आहे त्यांचे मालमत्तेची जप्ती करावी नळ कनेक्शन कट करावे वसुली करण्यासाठी कर्मचारी पाठवावे जे भरणा करीत नसतील त्यांचेवर नियमाने कार्यवाही करावी. मार्च पर्यंत घ्या.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : यापुर्वी प्रस्ताव येवून मंजूरी दिली ही असेल करात्यास तीन महिणे झाले नियमाने दुरूस्ती करू शकतो आज यास मंजूरी दयावी रद्द करायचे असल्यास सर्व पक्षाचे स.सदस्यांनी एकत्रित प्रस्ताव ठेवून रद्द करावे.

श्री.अ.रशिद खान :यापूर्वी ठराव झाला १२ टक्के व्याज आकारणी होते हे चुकीचे आहे त्या बाबतीत कोणती ही नियमावली नाही. सहा महिणे थांबवावे त्यानंतर ठराव ठेवून रद्द करावे.

श्री.गजानन बारवाल :नियमाने विलंब शुल्क वसूल करता येत नसेल तरी जो ठराव घेतला त्यानुसार कार्यवाही करणार होतो ती मार्च पर्यत मुदत द्यावी.

श्री.संतोष जेजूरकर :नामातंराचा प्रस्ताव जे ०.०१ टक्के चा प्रस्तावानुसार वार्ड कार्यालयास अदयाप पत्र दिले नाही ताबडतोब कार्यवाही व्हावी.

मा.महापौर :यावर प्रशासनाचे काय मत आहे हे ऐकूण घेतले पाहिजे.प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:सहा महिणे मुदत वाढवून घ्यावी प्रस्ताव ठेवून रद्द करता येईल.

करमुल्य निर्धा.व संकलक : २८ मार्च २००८ रोजी महापालिकेने जाहीर प्रगटन दिले होते त्यामध्ये १ ऑक्टोंबर २००८ पासून करन्टच्या मागणीवर ऑक्टोंबर पर्यत १ टक्के नोंव्हेंबरसाठी २ टक्के या वर्षाच्या मागणीच्या रक्कमेवर सुध्दा विलंब शुल्क आकारणीचा प्रस्ताव केला होता. त्यास सर्वसाधारण सभेने मंजूरी दिली होती. आता जो प्रस्ताव समोर आलेला आहे यामध्ये थकीत मालमत्ताच्या व्यतिरिक्त करन्टच्या मागणीवरील करावे लागेल नसता टेंक्नीकल अडचण येईल.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:यात दुरूस्ती करून रद्द करावे. नसता वेगळा प्रस्ताव ठेवून मंजूरी दयावी.

श्री.अ.रशिद खान :याची नियमावली आहे का ? व्याज लावू शकतो का ?

श्री.गजानन बारवाल :मागिल व चालू मागणीवर व्याज आकारण्यास तुर्त ६ महिणे स्थगित ठेवावी.

मा.महापौर :दंड लावण्या बाबत नियमावली तयार केलेली आहे का कोणत्या नियमाच्या अधारे व्याज लावलेले आहे प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.सतीष कटकटे :कोणत्या नियमाप्रमाणे १२ टक्के व्याज लावणार आहोत.

करमुल्य निर्धा.व संकलक:थकीत रक्कमेवर व्याज आकारणी बाबत बीपीएमसी ॲक्ट मध्ये तशी तरतूद नाही. परंतू नाशिक व इतर महापालिकेत थकीत रक्कमेवर विलंब शुल्क आकारणी केली जाते. त्या धर्तीवर आपण ठराव घेवून करत आहोत. सन २००७-२००८ मध्ये जे नागपुरचे लेखा परिक्षण झाले, त्यावेळी त्यांनी थकबाकीदारांना १०% व्याज लावण्याचा ॲडीट पॅरा दिला होता.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :नियमात तरतूद नसेल तर जे लावले ते रद्द करावे.

श्री.अ.रशिद खान :बीपीएमसी ॲक्ट नुसार या बाबतीत नियमावली असावयास पाहिजे जसे पाणी पुरवठया संबधीची नियमावली आहे जी चुक झाली होती ती दुरूस्त करून घ्यावी.

श्री.महेश माळवतकर :१२ टक्के व्याज आकारणी करण्याचा ठराव घेतला जे पैसे भरतात त्यांचेसाठी ते आहे जे अधिकारी /कर्मचारी वसुली करीत नाही त्यांचेवर कार्यवाही होत नाही करावी.हे रद्द करावे जे कर भरणा करीत नसेल त्यांचेवर कार्यवाही करावी. वसुली करण्याचे काम प्रशासनाचे आहे. त्यासाठी प्रशासनाने प्रयत्न करावे.

श्री.गजानन बारवाल :स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता हा प्रस्ताच रद्द करावा.

मा.महापौर : या विषयामध्ये जे १२ टक्के विलंब शुल्क लावलेले आहे असे कोणतेही विलंब शुल्क लावण्यात येवू नये म्हणून हा विषय रद्द करण्यात येतो कोणतेही दंड व व्याज लावण्यात येवू नये.परंतु शहरामध्ये अनेक लोक आहे त्यांचेकडे मोठी थकबाकी आहे.ती वसुल करण्यासाठी बीपीएमसी ॲक्ट नुसार जी काही कार्यवाही करता येते,ती करून वसुली केली पाहिजे.

श्री.संजय जोशी :नामांतर शुल्क आकारणी केले जाते ते रद्द करावे. आजच त्याची अमलबजावणी करण्याचे आदेशीत करावे.

मा.महापौर :आजच या बाबतीत प्रशासनाने कार्यवाही करावी आजच आदेश काढून उदयापासून याची अंमलबजावणी होईल,याची प्रशासनाने दखल घ्यावी

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मालमत्ता कराच्या थकबाकीवर जो १२ टक्के विलंब शुल्क लावलेले आहे असे कोणतेही विलंब शुल्क लावण्यात येवू नये म्हणून हा विषय रद्द करण्यात येतो. तसेच दंड व व्याज आकारणी करण्यात येवू नये यासह सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

पुरवणी विषय पत्रिका

विषय क्र. २९३ :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, कै.जनुभाऊ रानडे यांनी आपले संपूर्ण आयुष्य राष्ट्र कार्यास समर्पित केले आहे. त्यांची आठवण जनतेसमोर रहावी म्हणून भाग्यनगर येथील सेवायोजन कार्यालयासमोरील चौकास कै.जनार्दन दत्तात्रय उपाख्य जनुभाऊ रानडे हे नांव देण्यांत यावे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

सुचक : डॉ.भागवत कराड अनुमोदक : सौ.कला बोरामणीकर

मा.महापौर : विषय मंजूर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भाग्यनगर येथील सेवायोजन कार्यालयासमोरील चौकास कै.जनार्दन दत्तात्रय उपाख्य जनुभाऊ रानडे हे नांव देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. २९४ :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, ज्युब्लीपार्क शाळेमधील नविन बांधकाम वाचनालय यास ज्येष्ठ पत्रकार स्व.रफिक शहेबाज नांव देण्यात यावे. करीता ठराव मंजूरीस्तव सादर.

सुचक : सौ.विजया संजय बनकर,श्री.संजय जगताप

अनुमोदक : श्री.अशरफ मोतीवाला, श्री.नासेर नाहदी चाऊस, श्री.मिलींद दाभाडे

श्री.डॉ.भागवत कराड : रद्द करावे.

मा.महापौर :सभागृहात सूचक उपस्थित नाही, रद्द करण्यात येतो.

ठराव :

प्रस्तुत प्रस्तावाचे सूचक उपस्थित नसल्यामूळे प्रस्तुत प्रस्ताव रद्द करण्यांस मान्यता देण्यांत आली.

विषय क्र. २९५ :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सर्वे नं. १७९,१९२ व १३ या भागात सर्व नागरी सुविधा उपलब्ध असल्यामुळे या भागात जमा झालेली गुंठेवारी अंतर्गत रक्कम अंदाजे १४ लक्ष फक्त ही सर्वे नं.१५६ मध्ये रस्ता तयार करण्यासाठी वळती करणे बाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.सिताराम सुरे अनुमोदक : श्री.प्रकाश अत्तरदे

मा.महापौर : विषय मंजूर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सर्वे नं. १७९,१९२ व १३ या भागात सर्व नागरी सुविधा उपलब्ध असल्यामुळे,या भागात जमा झालेली गुंठेवारी अंतर्गत रक्कम अंदाजे १४ लक्ष ही रक्कम सर्वे नं.१५६ मध्ये रस्ता तयार करण्यासाठी वळती करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

विषय क्र. २९६ :

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद शहरातील बसेसवर व आतील बाजूस जाहीरात फ्लकास परवानगी देणे व शुल्काची आकारणी करणेकरीता मा.सर्वसाधारण सभा दि.२८.०२.२००२ रोजी विषय क्र.५७८/८ अन्वये मंजुर केलेल्या ठरावामध्ये शुल्काची आकारणीची तरतूद करण्यात आलेली नाही.

इतर महानगरपालिकाची माहिती मागविली असता अमरावती महानगरपालिकेचे दर हे रू.२.००/- प्रती चौ.फुट आहेत. नाशिक महानगरपालिकेच्या जाहीरात दरांमध्ये वाहनांवरील जाहीरातीचे दर नाहीत. नांदेड वाघाळा महानगरपालिकेच्या जाहीरात दरात वाहनांवरील जाहीरातीचे दर रू.२.२४/- प्रती चौ.फुट असे आहेत. ह्या सर्व दरांचा विचार करता व औरंगाबाद शहर बस वाहतूक असल्याने औरंगाबाद महनगरपालिकेसाठी दर ठरविणे आवश्यक आहे. औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे रू.२०/- प्रती चौ.फुट दरानुसार जाहीरात शुल्काची आकारणी करणे आवश्यक आहे. तरी सदर दरास मान्यता मिळणे आवश्यक आहे.

करीता फिरत्या वाहनांवर / बसेसवर जाहीरात प्रसिध्दी करण्यासाठी रू.२०/- प्रती चौ.फुट दर निश्चित करणेसाठी प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

संवाद :

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : स्थगित ठेवा. पूढच्या सभेत घेण्यात यावे.

मा.महापौर :याविषयावर सविस्तर चर्चा होणे अपेक्षीत आहे पुढील बैठकीत घेण्यात येईल.

ठराव :

प्रस्तुत प्रस्ताव पूढील बैठकीत घेण्यास मान्यता देण्यांत आली.

विषय क्र. २९७ :

मा.आयुक्त यांचे मान्यते अन्वये संचालक, प्राणी संग्रहालय यांनी प्रस्ताव सादर केला की, प्राणी संग्रहालयात सध्या (२९) सांबर व (२१) काळविट व (११) निलगाय हे प्राणी आहेत. त्यांची संख्या जास्त झाली असून सेंट्रल झु ऑथरिटी, नवी दिल्ली यांच्या निर्देशानुसार या प्राण्यांची देखभाल करणे करीता त्यांना उपलब्ध असलेली जागा कमी पडत असून त्यांच्या नैसर्गिक हालचालींवर बंधने येत आहेत. ज्यामुळे त्यांची रोगप्रतिकारक शक्ती कमी होऊन रोगराई होण्याची शक्यता आहे.

तरी प्राणी संग्रहालयात असलेले अतिरीक्त प्राणी सेंट्रल झु ऑथरिटी नवी दिल्ली यांचे निर्देशानुसार इतर प्राणी संग्रहालयास देणे, किंवा प्राणी वन विभागामार्फत गौताळा अभयारण्यात सोडणे हा दुसरा पर्याय आहे.

प्राणी संग्रहालयात (२१) सांबर, (१३) काळविट व (६) निलगाय अतिरीक्त असून वन विभागाची मान्यता घेऊन त्यांना गौताळा अभयारण्यात सोडणेकरीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सर्वसाधारण सभेसमोर सादर करणे योग्य.

मा.महापौर : प्राणी संग्रहालयात अतिरिक्त प्राणी सेंट्रल झू ॲथॉरिटी यांचे निर्देशानुसार इतर प्राणी संग्रहालयास देणेस मान्यता देण्यांत येते.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्राणी संग्रहालयात (२१) सांबर, (१३) काळविट व (६) निलगाय अतिरीक्त असल्यामूळे, सेंट्रल झू ॲथॉरिटी नवि दिल्ली यांच्या निर्देशानुसार इतर प्राणी संग्रहालयास देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. २९८ :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, गरमपाणी ते छावणी भागास जोडणाऱ्या पुलाची रूंदी व उंची वाढविणेकरीता आर.सी.सी.पुल बांधणे. या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २००७-२००८ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आलेले आहे. सध्या अस्तित्वात

असलेल्या बॉक्स टाईप कल्वर्हटची उंची कमी असल्याने पावसाळ्यात खाम नदीस पुर आल्यानंतर पाण्याची पातळी सध्याच्या पुलावरून २ ते ३ मीटर जास्त असते. अशावेळी ह्या पुलावरील वाहतूक पूर्णपणे बंद होते. तसेच नागरीकांना छावणी भागात जाणाऱ्या बारापुल्ला गेट हा रस्ता अरूंद असल्याने तेथे दररोज वाहतुकीची कोंडी होत असते. अशावेळेस छावणी भागात जाण्याकरीता गरमपाणी मधील रस्ता हा उत्तम पर्याय होवू शकतो. तसेच दर गुरूवारी छावणी भागात मोठ्या प्रमाणावर आठवडी बाजार भरत असतो. त्याकरीताही नागरीक मोठ्या प्रमाणावर सदर पुलावरून वाहतूक करत असतात. ह्या सर्व बाबी विचारात घेवून मा.सर्वसाधारण सभा दिनांक ०८.०२.२००७ विषय क्रमांक ७६७ अन्वये या कामासाठी ठेवण्यत आलेला प्रस्ताव रक्कम रूपये ४० लक्ष मंजूर करण्यात आलेला आहे.

या कामाचा खर्च सन २००८-२००९ या आर्थिक वर्षात नवीन पुल बांधणे या लेखाशिर्षातून पान क्रमांक डब्ल्यु-२७ रक्कम रूपये २०.०० लक्ष व पान क्र.डब्ल्यु जी.बी.०५ वर अ.क्र.वरील रक्कम रूपये २५.०० लक्ष असे एकूण रक्कम रूपये ४५.०० लक्ष मधून करण्यात येत आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

तरी रक्कम रूपये ४२,४०,१००/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

मा.महापौर : विषय मंजूर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गरमपाणी ते छावणी भागास जोडणाऱ्या पुलाची रूंदी व उंची वाढविणेकरीता आर.सी.सी.पुल बांधणेच्या र.रू. ४२,४०,१००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. २९९ :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एन-४ येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा ते मुकुंदवाडी रेल्वेस्टेशन या रस्त्याचे डांबरीकरण व मजबुतीकरणासाठी सन २००७-२००८ च्या दरसूची नुसार रू.६६,१५,००० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्तांची मान्यता प्राप्त आहे. सदर अंदाजपत्रकास रस्त्याचे मजबुतीकरण, डांबरीकरण व ज्या ठिकाणी रस्त्यालगत गटार नाही तेथे ती बांधणे इ.बाबींचा समावेश आहे. सदर कामासाठी सन २००८-०९ च्या अंदाजपत्रकास रू.३८ लक्षची तरतूद आहे. उर्वरित खर्चासाठी स.नगरसेविका सौ.पुष्पाताई बाळुनाना शिंदे यांनी,

०१	WSC-2	अ.क्र.५	-	रू.५ लक्ष
०२	WSC-16	अ.क्र.१४	-	रू.५ लक्ष
०३	WGB-2	अ.क्र.२७	-	रू.५ लक्ष
०४	WGB-8	अ.क्र.६१	-	रू.५ लक्ष
०५	WGB-13	अ.क्र.२७	-	रू.५ लक्ष
०६	WSC-5	अ.क्र.४९	-	रू.५ लक्ष

असा एकूण रू.३० लक्षचा निधी वळविण्यास संमती दिली असून त्यानुसार लेखाशिर्ष बदलासह रू.६६,१५,००० चे अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर.

संवाद :

श्री.अ.रशिद खान :मंजूर करण्यास हरकत नाही परंतू या रस्त्यावर ७-८ घरे मध्ये येत आहे ते काढले तर रस्ता चांगला करता येईल

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:रस्ता विकास करतांना श्रीमंताचे घर काढले जात नाही गरीबांचेच काढणे हे उचित नाही.सर्वांना सारखाच न्याय दयावा.

डॉ.भागवत कराड :मंजूरी देण्यात यावी.
मा.महापौर :हा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-४ येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा ते मुकुंदवाडी रेल्वेस्टेशन या रस्त्याचे डांबरीकरण व मजबुतीकरणासाठी सन २००७-२००८ च्या दरसूची नुसार रू.६६,१५,००० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सन २००८-०९ च्या अंदाजपत्रकात रू.३८ लक्षची तरतूद असल्यामूळे, उर्वरित खर्चासाठी स.नगरसेविका सौ.पुष्पाताई बाळुनाना शिंदे यांच्या वॉर्डासाठी अर्थसंकल्पात असलेल्या प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.०१ ते ०६ प्रमाणे असलेली तरतूद र.रू.३० लक्ष वळती करणेस व लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा.महापौर :प्रशासनाचे ऐनवेळचे विषय आलेले आहे.
श्री.गजानन बारवाल :प्रश्नावर चर्चा व्हावी, त्यानंतर ऐनवेळचे विषय घ्यावे.

प्रश्न :

श्री.गजानन बारवाल :स.सदस्य नियमानुसार प्रश्न विचारतात श्री.सतीष कटकटे हे दीड वर्षापासून प्रश्न या विषयपत्रिकेतील २९ क्र.चा प्रश्न विचारलेला आहे उत्तर दिले नाही याचे कारण काय ?
मा.महापौर :या बाबतचा खुलासा प्रशासनाने करावा.
उपअभियंता (न.र.) :या बाबतची माहिती संकलीत करण्याचे काम चालू आहे आठ दिवसात माहिती दिली जाईल.
श्री.सतीष कटकटे :दिं.१६-७-२००७ रोजी प्रश्न विचारलेला होता पुन्हा विचारला दीड वर्ष झाले अदयाप उत्तर दिले नाही कारण काय ?
उपअभियंता (न.र.) :सविस्तर माहिती काढावी लागणार आहे काही माहिती संकलीत केली आहे.
श्री.गजानन बारवाल :भुसंपादनासाठी किती मोबदला दिला याची माहिती प्रशासनाकडे असायला पाहिजे ती लगेल दयायला पाहिजे होती.
श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :दीड वर्षापासून विभागाकडून उत्तर मिळत नसेल तर संबधीत अधिकारी यांना सेवा करण्याची गरज नाही घरी पाठवावे.
मा.महापौर :उत्तर न देण्याचे कारण काय ?
उपअभियंता(न.र.) : कर्मचारी वर्ग कमी असल्यामूळे माहिती काढणे शक्य झाले नाही.
श्री.मो.जावेद मो.इसहाक: प्रश्न विचारल्यानंतर दीड वर्ष उत्तर सदस्यांना मिळत नसेल तर असे अधिकारी यांना त्या पदावर राहण्याचा अधिकार नाही. त्याची बदली करावी.
श्री.सतीष कटकटे :उत्तर देत नाही तोपर्यत सभेचे कामकाज चालवू नये
श्री.संजय जोशी :या विभागाचे विभागप्रमुख नसल्याने उत्तर दिले नाही. लेखा विभागातून माहिती आठ दिवसात मिळाली असती. उत्तर देण्याची एका उपअभियंत्याचीच जबाबदारी आहे का.विभाग प्रमुख उपस्थित राहयला पाहिजे आजपर्यत प्रशासनाने का विचार केला नाही.जबाबदारी कुणाची होती खुलासा घ्यावा.
उपआयुक्त (म) :सहा.संचालक नगररचना या पदाचा अतिरिक्त पदभार असलेले अधिकारी मागिल एक वर्षापासून कुठल्याही बैठकीला आलेले नाही.उपअभियंता यांनी जी माहिती संकलीत केली आहे ती स.सदस्य यांना आजच उपलब्ध करून दयावी उर्वरीत माहिती एक आठवडयात दिली जाईल.
श्री.सतीष कटकटे :प्रश्न दिल्यानंतर आजपर्यत उत्तर दिले नाही संबधीतावर काय कार्यवाही करणार आहे.

उपआयुक्त (म) :सहा.संचालक नगररचना यांचा या बाबतीत खुलासा घेतला जाईल व पुढील बैठकीला ते उपस्थित राहतील या बाबत कार्यवाही करण्यात येईल.

श्री.संजय जोशी :प्रशासनाने यासाठी स्पेशल अधिकारी नेमून प्रश्नाचे उत्तर ताबडतोब दयावे.

श्री.सय्यद खुसरो :या विभागातील सर्वच कर्मचारी व्यवस्थीत काम करीत नाही त्यांना त्या विभागातून हटवावे.

श्री.गजानन बारवाल :उत्तर न देण्यास जे जबाबदार असतील त्यांचेवर कार्यवाही करावी. सदस्यांच्या हक्काचा भंग होतो.

मा.महापौर :स.सदस्य जे प्रश्न विचारतात त्यांचे उत्तर संबधीत अधिकारी किंवा मा.आयुक्त यांनी देणे हे नियमाने बंधनकारक आहे.स.सदस्य श्री. सतीष कटकटे यांनी प्रश्न दिला दीड वर्षात उत्तर मिळत नसेल तर गंभीर बाब आहे.प्रशासनाने या बाबत दखल घेतली नाही वारवांर प्रश्न विचारले जातात त्यांचे उत्तर दिले जात नाही असे निदर्शनास येत आहे प्रश्न दिल्यानंतर न देणे हे चूकीचे आहे. प्रशासनाने प्रश्नाचे उत्तर या सभागृहात सादर करणे बंधनकारक आहे स.सदस्य श्री. कटकटे सतीष यांचे प्रश्नाचे उत्तर अदयाप त्यांना दिलेले नाही. संबधीत अधिकारी यांनी त्यांचे प्रश्नाचे उत्तर येणा-या सर्वसाधारण सभेपर्यत किंवा त्यापूर्वी दयावे. संबधीत अधिकारी नसतील तर उत्तर देणे हे मा.आयुक्तांना बंधनकारक आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:नगररचना विभागाचे सहा.संचालक शासनाने आठ दिवसात पाठवावे असे यात नमुद करावे.

मा.महापौर :पुर्ण वेळ सहा.संचालक नगररचना हे अधिकारी मिळतील यासाठी प्रशासनाने शासनाकडे मागणी करावी.

श्री.सतीष कटकटे :प्रश्न क्र.३० नुसार बचत गटांसाठी घेण्यात आलेले वाहन संदर्भात माहिती विचारली होती उत्तर मिळाले नाही.

प्रकल्प संचालक :सदर प्रकरणाचे उत्तर प्रकल्प संचालक श्री.सुर्यवंशी यांनी स.सदस्य यांचे घरी कालच पाठविले अशी माहिती माझेकडे मिळाली.

श्री.संजय जोशी :सदर गाडया कुणाच्या मालकीच्या आहे.

प्रकल्प संचालक :बचत गटाच्या मालकीच्या आहेत.

श्री.संजय जोशी :बचत गटाच्या मालकीच्या असेल तर त्या महापालिकेच्या प्रांगणात का उभ्या आहेत हया गाडया घेतांना जेव्हा ठराव आला त्यावेळी बचत गटांना कर्जाच्या घाईत टाकू नये असे मी वारंवार सुचना मांडली होती. याच प्रमाणे स्थायी समितीच्या सभागृहात सुध्दा विरोध झालेला होता.त्यावेळी सभागृहाचे मत लक्षात न घेता प्रशासनाने ठराव मंजूर करून घेतला त्याची परीनिती आज दिसून येते. त्या बचत गटांना कर्जाच्या घाईत टाकले. आता त्यापूढे त्या बचत गटांना ब्लॅकलिस्ट केले जाईल व त्यांचे मालमत्तेतून ही रक्कम बँक वसूल करेल यास कोण जबाबदार आहे. मा.आयुक्त येतील ते निघून जातात. ते शहराचा कारभार चालविण्याचा प्रयत्न करतात.

श्री.सतीष कटकटे :डिझेल की पेट्रोल गाडी घ्यायची यासाठी सभागृहाची मान्यता घेतली का? एक लिटर मागे किती कि.मीटर चालते.तो बचत गट यात कर्जाची परतफेड करू शकेल का परवडणारे आहे का एक गाडी गॅरेजमध्ये आहे चार महिण्यापासून गाडया उभ्या आहेत.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:ही योजना शासनाची होती शासनाने कर्ज दिले पुर्वीचे प्रशासनाने मंजूरी देवून त्यांची बदली झाली यापूर्वी त्यास मान्यता दिली ज्याचा विरोध होता ते आज सत्तेत आहे

श्री.संजय जोशी :विरोधचा प्रश्न नाही गाडया बचत गटाच्या आहेत तर महापालिकेच्या प्रांगणात का उभ्या आहे.बचत गटाची फसवणूक केली असे नागरीकाच्या चर्चेत आहे.ठराव आला त्यावेळी मी म्हटले होते की ५० रू.लि.पेट्रोल आहे ७ कि.मी.गाडी चालणार हे बचत गटांना करणे परवडणारे नाही. जशा शहरात मीटर रिक्षा चालतात त्याप्रमाणे हया गाडया चालणार असे मत प्रशासनाने मांडले होते.ठराव मंजूर करून घेतला त्याच गाडया महापालिकेच्या प्रांगणात उभ्या केल्या म्हणजे आमची जबाबदारी संपली असे बचत गटांना वाटू लागले.या गाडयाचे काय करणार खुलासा करावा.

श्री.सतीष कटकटे : ही डिझेल गाडी आहे परवडणारे नाही असे प्रशासनाने सभागृहाच्या निदर्शनास आणून दयायला पाहिजे होते.सभागृहाची फसवणूक करून कार्यवाही केली या प्रकरणाची सखोल चौकशी करावी.जे जबाबदार अधिकारी आहे त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.संजय जोशी :गाडया प्रमाणेच जीपीआरए सिस्टीम करण्यासाठी विरोध केला होता. जर हप्ताच भरू शकणार नाही तर १०० रू जीपीआरए सिस्टीमचे कसे भरणा करणार होते.

श्री.भगवान घडमोडे :गरीब बचत गटाकडून बँक वसूली करणार त्यांचे घरसंसार उध्दस्त होणार त्या बचत गटासाठी महापालिका काय करू शकते याचा विचार करावा.

श्री.अ.रशिद खान मामू :स्थायी समितीने रद्य केले असतांना गाडया कशा घेतल्या.

प्रकल्प संचालक :स्थायी समितीमध्ये निर्णय होण्या अगोदरच गाडया पर्चेसींगची ऑर्डर दिलेली होती. कोणता व्यवसाय करायचा हा बचत गटाने निर्णय घ्यायचा असतो बचत गटाने ठराव घेतल्यानंतर बँकेला प्रपोजल पाठविले बँकेने ते मंजूर केले वास्तविक १७ प्रकरणे मंजूर झाली होती जेंव्हा हया गाडया घेवून बचत गटांना अनुभव आला त्यामूळे बाकीचे गाडया घेण्याचे थांबविले हया गाडया बाजारमध्ये चालत नाही वस्तुस्थिती आहे जीपीआरए सिस्टीम मंजूर झाली असती तर कदाचित असे झाले असते एक सेल निर्माण करणार होतो जी गाडी प्रवाशांना लागत असेल तर त्यांनी दुरध्वनी करणार व गाडी घेणार यामूळे व्यवसाय मिळणार होता.तीन गाडया घेतल्यानंतर लक्षात आले की त्यांना मीटर मीळणार नाही असवलेले ते एजन्सीने परत नेले आहे. म्हणून हा व्यवसाय करायचा नाही असे ठरले.

श्री.संजय जोशी :जीपीआरए सिस्टीम व याचा संबध येत नाही.ट्रायल मध्ये जीपीआरए सीस्टीम बसवायचे पैसे एखादा व्यक्ती देत असेल तर व्यवसाय मिळेल का? मिळत नाही. जीपीआरए सिस्टीम म्हणजे काय बचत गट कर्ज कसे परतफेड करणार याचा खुलासा दयावा.

प्रकल्प संचालक :बचत गटांना व्यवसाय मिळावा यासाठी जिल्हा परिषद व टुरिस्ट, ट्रॅव्हल एजन्सीज विनंती करणार आहे

श्री.संजय जोशी :व्यवसाय देण्याची जबाबदारी प्रशासनाची नाही नवीन अपेक्षा त्यांना पुन्हा दाखवू नये.ही गाडी लिटर मागे १० कि.मी.चालते इतर गाडया १८ कि.मी.चालतात कोण हया गाडया लावणार आहे.

श्री.गजानन बारवाल :हे प्रकरण गांभीर्याने घेवून त्या बचत गटांना काय जी मदत करता येईल ती कावी नसता गाडया महापालिकेने हॅडवर्क कराव्या अधिका-यांसाठी दयाव्यात.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : योजना फिजीबल नाही म्हणून स्थायी समितीने निर्णय घेतला होता त्यामूळे महापालिकेवर त्यांची काहीही जबाबदारी येत नाही.शासनाची योजना आहे

५० टक्के कर्ज व ५० टक्के सबसिडी त्यामूळे गाडया विकाव्या जे कर्ज आहे ते परतफेड करावे प्रश्न मिटतो.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:महापालिकेची काहीही जबाबदारी नाही शासनाची योजना आहे सबसिटी मिळते. नफा तोटा संदर्भात बचत गट बघेल. त्यावर चर्चा नको.

मा.महापौर :स.सदस्यांनी प्रश्न विचारणा केल्यानंतर त्या त्या अधिका-यांनी उत्तर देणे बधंनकारक आहे नसता संबधीत अधिकारी यांचेवर कार्यवाही होईल याची नोंद घ्यावी प्रश्न क्र. ३१ बाबतचे उत्तर ही दिलेले नाही.

श्री.सिताराम सुरे :१९९३ ला कामधेनू हौंसींग सोसायटीला महापालिकेने बांधकाम परवानगी दिली रेखांकन तयार केले.सन २००३ मध्ये त्याच बाजूला सनी सेन्टर नावाची नवीन योजना एका बिल्डरने केली ४५ मीटरचा रस्ता हा २००१ ला शासनाने मंजूर असतांना २००३ मध्ये या बिल्डरला परवानगी कशी दिली ४५ मी रस्ता कोठून तयार होणार आहे. हौसींगचे सदस्यांनी पहिल्या मजल्यासाठी बांधकाम परवानगी मागीतली दिली नाही.३० मी.रस्ता होता त्यावेळी कामधेनू हौसींग सोसायटीला मंजूरी मिळाली. या सोसायटीत पुर्ण सेवानिवृत्त तसेच वयोवृध्द नागरीक राहतात.नागरीक चकरा मारतात संचिका मिळत नाही असे अधिकारी सांगतात त्या नागरीकांना न्याय मिळेल असे आदेशीत करावे.

उपअभियंता(न.र.) :जाधववाडी ते पिसादेवी हा रस्ता २००१ च्या विकास योजने प्रमाणे मंजूर असून ४५ मी.रूंद आहे.

श्री.सिताराम सुरे :२००१ मध्ये विकास योजनेला मंजूरी दिली असतांना सनी सेंन्टरला २००३ मध्ये कोणत्या बेसवर परवानगी दिली.

उपअभियंता(न.र.) :४५ मी. रूंद रस्त्या प्रमाणे मंजूरी दिली आहे.

श्री.सिताराम सुरे :आज रोजी ४५ मी. रस्ता अस्थीत्वात नाही ३० मी.आहे.कामधेनू हौसींग सोसायटीस १९९३ मध्ये मजुंरी दिलेली असतांना या सोसायटीमधील नागरीकांना पहिल्या मजल्यासाठी परवानगी दिली जात नाही ते नागरीक कंटाळून अनाधिकृत घरे बाधंतील यास महापालिका जबाबदार राहील.

उपअभियंता(न.र.) :या बाबतची संचिका सध्या माझेकडे नाही. संचिका बघून किती मीटर रूंदीचा रस्ता आहे हे सांगता येईल.

श्री.संजय जोशी :यावरून असे लक्षात येते की अधिकृत रित्या कामधेनू सोसायटीची परवानगी थांबविलेली आहे का ?नसेल तर १९९३ ला जो ले-आऊट मंजूर झाला त्या सर्व लोकांना परवानगी मिळेल का?

उपअभियंता(न.र.) :बांधकाम परवानगी थांबविलेली नाही.जे लोक परवानगी मागण्यासाठी येतील त्यांना विकास योजने प्रमाणे नियमानुसार परवानगी दिली जाईल.

श्री.संजय जोशी :१९९३ ला लेआऊट मंजूर केल्यानंतर पुन्हा विकास योजनेचा प्रश्न येत नाही.१९९३ अगोदर येतो त्यामूळे या सोसायटीतील लोकांना परवानगी दयायला पाहिजे त्यांचा तो हक्क आहे. परवानगी देण्याचे आदेशीत करावे.

उपअभियंता (न.र.) :विकास योजने प्रमाणे असेल तर त्याप्रमाणे कार्यवाही करता येईल.

श्री.गजानन बारवाल :या बाबत आपल्या दालनात बैठक आयोजित करून मार्ग काढावा.

श्री.संजय जोशी :दोन दिवसात आपल्या दालनात बैठक आयोजित करून संबधीत नागरीक व अधिकारी संबधीत स.सदस्य यांचे समवेत चर्चा करून हा प्रश्न सोडवावा.

मा.महापौर :या बाबतीत एक बैठक आयोजित करावी. संबधीत अधिकारी यांनी सर्व माहिती घेवून बैठकीला हजर राहवे व एकत्रित बसून या बाबत निर्णय करावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : ऐनवेळचे कोणते, सदस्यांना प्रत दिली नाही. काय चर्चा करावी. समजणार नाही.

श्री.गजानन बारवाल : यापूढे ऐनवेळचे येणारे विषयाची स.सदस्यांना प्रत दिली जावी.

विषय क्र. ३०० :

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, दिनांक १७ व १८ सप्टेबंर २००८ रोजी औरंगाबाद शहरात झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीमध्ये औरंगाबाद महानगरपालिकेच्या नक्षत्रवाडी संतुलन टाकीपासून शहरापर्यंत असलेल्या ७०० मी.मी.व १४००मी.मी. व्यासाच्या Prestressed Cement Concrete (PSC) जलवाहीन्या बदलण्यासाठी ४० कोटी रूपये मंजूर झालेले आहेत. तसेच औरंगाबाद शहर वितरण वाहीन्यांतील जास्त खराब झालेल्या जलवाहीन्या (ज्या ठिकाणी जास्त गळत्या आहेत त्या भागातील जलवाहीन्या) बदलण्यासाठी रक्कम रूपये ३० कोटी मंजूर झाले आहेत.

त्यानुसार नक्षत्रवाडी संतुलन टाकी ते शहरापर्यंत ७०० मी.मी. व १४०० मी.मी. व्यासाच्या जलवाहीन्या बदलून त्याऐवजी एम.एस.जलवाहीन्या टाकण्याच्या कामांचे एकत्रित अंदाजपत्रक रक्कम रूपये ४० कोटी चे तयार केलेले आहे. तसेच औरंगाबाद शहराचा पूढील ३० वर्षाचा सर्वसमावेशक विचार करून वितरण प्रणालीचे Re-engineering करून Hydraulic Model तयार करून सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याचे काम चालू आहे. त्या DPR नुसार वितरण प्रणालीमध्ये प्राधान्याक्रमाने ज्या वितरण वाहीन्या बदलावयाच्या आहेत त्या बदलण्यासाठीचे रक्कम रूपये ३० कोटीचे अंदाजपत्रक तयार केले आहे.

उपरोक्त प्रमाणे अंदाजपत्रकांचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

संवाद :

श्री.अ.रशिद खान :यात महापालिकेला माझे माहिती प्रमाणे २५ कोटी खर्च करावे लागणार ही रक्कम कोठून आणणार आहे सविस्तर खुलासा होणे अपेक्षीत आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:शासनाचा निधी येणार आहे तो आल्यानंतर काम चालू करावे नसता महापालिकेचा निधी खर्च होईल इतर विकास कामे थांबतिल.

श्री.गजानन बारवाल :समांतर जलवाहिनीसाठी निधी आणण्याचे प्रयत्न करीत आहोत.त्या निधीची गरज होती हा निधी जरी येत असेल केंव्हा येईल माहित नाही प्रशासकीय प्रस्ताव आलेला आहे मान्यता देण्यास हरकत नसावी.

श्री.त्र्यंबक तुपे :शासनाकडून निधी प्राप्त झालेला नाही प्रस्ताव आणला यात महापालिकेचा किती खर्च करावा लागणार आहे. मंजूरी देणार,काम सुरू करणार, शासनाकडून निधी येण्यास वेळ लागल्यास या कामासाठी खर्च करण्याची तशी परीस्थिती महापालिकेची नाही, शहरातील अनेक कामे करणे गरजेचे आहे महापालिकेला खर्च करावा लागत असेल तर मंजूर देण्याची घाई करू नये.

मा.महापौर : महापालिकेचा सहभाग किती, असणार की नाही याचा स्पष्ट खुलासा करावा.

कार्य.अभियंता(पापू) :१०० कोटी पैकी २५ टक्के महापालिकेचा शेअर राहिल इतर शासनाचा निधी राहील.

श्री.अ.रशिद खान :२५ टक्के कोठून खर्च करणार आहे याचाही खूलासा करावा.

श्री.संजय जोशी :२५ कोटीचा उल्लेख ठरावात केलेला नाही.हा खर्च कोठून करणार आहे बजेट मध्ये कोठे नमूद केले आहे माहिती घ्यावी.बजेट मध्ये नाही महापालिकेकडे पैसे नाही यास आमचा विरोध आहे.हा खर्च शासनाने करावा नसता महापालिकेकडे निधी उपलब्ध झाल्यानंतर करावे.यात पीएमसीला सुध्दा मंजूरी देत आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :७५ कोटी शासन देणार तेवढयाच रक्कमेची कामे करावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:यास मान्यता दयाची की नाही यासाठी आलेले आहे.शासनाचा निधी येईल बजेट मध्ये तरतूद होईल त्यानंतर कामे सुरू होतील.

श्री.भगवान घडमोडे :मागिल मंत्रिमंडळाच्या बैठकीत शासनाने किती अनुदान मंजूर केले होते व आतापर्यत किती महापालिकेला मिळाले.

श्री.अ.रशिद खान :२५ कोटी कोठून खर्च करणार आहे.हा जनतेचा पैसा आहे.

श्री.गजानन बारवाल :हा विषय मंजूर करावा.

डॉ.भागवत कराड :येणारा निधी पिण्याच्या पाण्यावर खर्च होत असेल तर मंजूरी देण्यात यावी. जेंव्हा शासनाकडून निधी येईल तेंव्हा काम चालू करावे.

श्री.गजानन बारवाल :यास मंजूरी देण्यास हरकत नाही.

मा.महापौर : हा विषय मंजूर करण्यांत येतो दिनांक १७-१८ सप्टेबंर २००८ रोजी संपन्न झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी ७० कोटीचा निधी मिळालेला आहे. यात नक्षत्रवाडी संतुलन टाकीपासून १४०० मी.मी. व्यासाची पी.एस.सी. जलवाहीनी तसेच ७०० मी.मी. व्यासाची पी.एस.सी. जलवाहीनी अनुक्रमे रेल्वेस्टेशन ते क्रांतीचौक पर्यंत बदलण्याकरीता ४० कोटीच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. त्याचप्रमाणे औरंगाबाद शहरातील नक्षत्रवाडी संतुलन टाकीपासून शहरापर्यंत व शहराअंतर्गत वितरण व्यवस्थेचा परीपूर्ण अभ्यास करून सविस्तर प्रकल्प अहवाल (Detail Project Report) तयार करण्याचे काम सुरू आहे. त्या प्रकल्प अहवालानुसार शहरातील जून्या जलवाहीन्या प्राधान्याने बदलण्यासाठी र.रू.३० कोटीच्या अंदाजपत्रकासही मान्यता देण्यात येते. आज जे पाणी शहरास मिळते ते परिमाण आवश्यकतेपेक्षा कमी आहे. पाणी परिमाण वाढविण्यासाठी समांतर जलवाहीनीची या शहराला आवश्यकता आहे. या कामास जरी मान्यता दिली असली तरी समांतर जलवाहीनीचे महत्व कमी होत नाही. समांतर जलवाहीनीसाठी ही प्रशासनाने पूर्णपणे प्रयत्न करावे. त्यासाठी तात्काळ निधी उपलब्ध करून घ्यावा.

मुख्यलेखाधिकारी :सन२००७-०८ या वर्षामध्ये मराठवाडा विकास कालबध्द कार्यक्रम या अंतर्गत शासनाने ९.२३ कोटी मंजूर केले होते त्यापैकी दि.२७-१०-२००८ रोजी शासनाने शासन निर्णय प्राप्त केलेला आहे त्यात ४.६३ कोटी दिलेले आहे.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक १७ व १८ सप्टेबंर २००८ रोजी औरंगाबाद शहरात झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीमध्ये औरंगाबाद महानगरपालिकेच्या नक्षत्रवाडी संतुलन टाकीपासून शहरापर्यंत असलेल्या ७०० मी.मी.व १४००मी.मी. व्यासाच्या Prestressed Cement Concrete (PSC) जलवाहीन्या बदलण्यासाठी ४० कोटी रूपये मंजूर झालेले असल्यामूळे, तसेच औरंगाबाद शहर वितरण वाहीन्यांतील जास्त खराब झालेल्या जलवाहीन्या (ज्या ठिकाणी जास्त गळत्या आहेत त्या भागातील जलवाहीन्या) बदलण्यासाठी रक्कम रूपये ३० कोटी मंजूर झाले असल्यामूळे, त्यानुसार नक्षत्रवाडी संतुलन टाकी ते शहरापर्यंत ७०० मी.मी. व १४०० मी.मी. व्यासाच्या जलवाहीन्या बदलून त्याऐवजी एम.एस.जलवाहीन्या टाकण्याच्या कामांचे एकत्रित अंदाजपत्रक रक्कम रूपये ४० कोटी तसेच औरंगाबाद शहराचा पूढील ३० वर्षाचा सर्वसमावेशक विचार करून वितरण प्रणालीचे Re-engineering करून Hydraulic Model तयार करून सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यास व DPR नुसार वितरण प्रणालीमध्ये प्राधान्याक्रमाने ज्या वितरण वाहीन्या बदलावयाच्या आहेत त्या बदलण्यासाठीचे तयार केलेले रक्कम रूपये ३० कोटीचे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ३०१ :

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, दिनांक १७ व १८ सप्टेंबर २००८ रोजी औरंगाबाद शहरात संपन्न झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीमध्ये शहरातील मलनि:सारण योजनेअंतर्गत मलि:सारण प्रक्रिया केंद्र (Sewage Treatment Plant) उभारणीसाठी रक्कम रू.३० कोटीचा निधी मंजुर झाला आहे.

पुर्वीची १७०.०० कोटीची योजना मंजुर आहे. त्या योजनेमध्ये दर्शविलेली (Sewage Treatment Plant) साठी लागणारी पाटोदा शिवारातील प्रस्तावीत जागा अजूनही मनपाच्या ताब्यात नसल्यामुळे आणि निधी उपलब्ध न झाल्यामुळे ती योजना प्रत्यक्षात साकार झालेली नाही.

सध्या उघडया नाल्यामधुन वाहणारे प्रक्रियारहीत सांडपाण्यामुळे,महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या नोटीसा येत आहेत. याबाबी आणि सध्याची प्रत्यक्ष स्थितीचा विचार करता सर्वेक्षणानुसार उपलब्ध होणाऱ्या जागांवर (DEWATS) पध्दतीने मलनि:सारण प्रक्रिया केंद्र (Sewage Treatment Plant) उभारणे आवश्यक आहे.

नुकतेच शहरातील विविध ठिकाणच्या जागांचे सर्वेक्षण केले असता १) बनेवाडी SEWAGE PUMPING STATION परिसर. २) प्राणी संग्रहालय,सिध्दार्थ उद्यान परिसर ३) कांचनवाडी जुने Oxidation Pond परिसर. ४) सलीम अली सरोवर परिसर ५) जाधववाडी परिसर,इत्यादी ठिकाणी आणि या व्यतिरीक्त उपलब्ध होणाऱ्या सोईच्या ठिकाणी आवश्यक त्या क्षमतेचे मलनि:सारण प्रक्रिया केंद्र उभारण्याचे प्रस्तावीत आहे.

करीता उपलब्ध झालेल्या रक्कम रू.३०.०० कोटी निधी मधून मलनि:सारण प्रक्रिया केंद्र (Sewage Treatment Plant) उभारणेचा प्रस्ताव/अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर.

संवाद :

श्री.संजय जोशी :१०० कोटीमध्ये २५ टक्के खर्च हा महापालिकेला करावा लागेल यात नमूद करावे.

डॉ.भागवत कराड :शासनाकडून १०० कोटी व महापालिकेने २५ कोटी असा खर्च होणार की १०० कोटीत २५ कोटी महापालिकेला खर्च करणार आहे

श्री.संजय जोशी :२५ टक्के महापालिका खर्च करणार आहे असे प्रस्तावात का नमूद केले नाही.तसा उल्लेख ठरावात यायला पाहिजे. नसता शहरातील नागरीक शासनच १०० कोटी देणार आहे असे समजतील.

डॉ.भागवत कराड :२५ टक्के खर्च महापालिकेला करणार ७५ टक्के शासनाचे अनुदान राहील अशी दुरूस्ती करून मान्यता दयावी.दोन्ही ठरावाच्या कामास लवकरात लवकर सुरूवात करावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :शासन १०० कोटी देणार आहे किती निधी येणार किती टाकायचे हे विचारण्याचे अधिकार आपल्याला नाही. २५ कोटी खर्च करा किंवा करू नये शासन १०० कोटी देणार आहे.

मा.महापौर : या महापालिकेचा जो शेअर होता त्यांचा स्पष्टपणे उल्लेख करावयास पाहीजे होता. हा प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक १७ व १८ सप्टेंबर २००८ रोजी औरंगाबाद शहरात संपन्न झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीमध्ये शहरातील मलनि:सारण योजनेअंतर्गत मलि:सारण प्रक्रिया केंद्र (Sewage Treatment Plant) उभारणीसाठी रक्कम रू.३० कोटीचा निधी मंजुर झाला असल्यामूळे, शहरातील विविध ठिकाणच्या जागांचे सर्वेक्षण केले असता १) बनेवाडी SEWAGE PUMPING STATION परिसर. २) प्राणी संग्रहालय,सिध्दार्थ उद्यान परिसर ३) कांचनवाडी जुने Oxidation Pond परिसर. ४) सलीम अली सरोवर परिसर ५) जाधववाडी परिसर, इत्यादी ठिकाणी आणि या व्यतिरीक्त उपलब्ध होणाऱ्या सोईच्या ठिकाणी आवश्यक त्या क्षमतेचे मलनि:सारण

प्रक्रिया केंद्र,उपलब्ध झालेल्या रक्कम रू.३०.०० कोटी निधी मधून (Sewage Treatment Plant) उभारणेच्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ३०२ :

मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र शासनाने सफाई कामगारांसाठी घरकुल बांधणीच्या निर्णयास मंजुरी दिलेली आहे. सदर निर्णयाची अंमलबजावणी महानगरपालिका स्तरावर होणे गरजेचे आहे, त्यादृष्टीने महानगरपालिकेकडील २२०० सफाई कामगारांसाठी घरकुल बांधणी प्रकल्प हाती घेणे प्रस्तावीत आहे. सदर घरकुल बांधणीसाठी महाराष्ट्र शासनाकडून अनुदान प्राप्त होत आहे. घरकुल बांधणी प्रकल्प राबविण्यासाठी पात्र लाभार्थी निवडीचे सर्व्हेक्षण करणे, सविस्तर अंदाजपत्रके/आराखडे तयार करणे, सविस्तर प्रकल्प अहवाल दाखल करून शासनाची मंजुरी मिळविणे इत्यादी कामे करण्यासाठी प्रकल्प अंदाजपत्रकीय रकमेच्या २% दराने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नेमणुकीचे अधिकार आयुक्त,महानगरपलिका औरंगाबाद यांना प्रदान करणेस तसेच उक्त प्रस्तावित प्रमाणे महानगरपालिकेकडील २२०० सफाई कामगारांसाठी घरकुल बांधणीच्या प्रकल्पास मंजुरी मिळणे तसेच सदर घरकुल बांधणी प्रकल्पासाठी महानगरपालिकेची जमीन (शासकीय जमीन) उपलब्ध करून देण्यास प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

संवाद :

श्री.संजय जोशी :यापूर्वी ज्या कर्मचा-यांना घरे दिली त्यांचे पगारातून रक्कम कपात होते ६० टक्केच पगार हातात येतो ज्यांचे पगारातून घराचे पैसे कपात होता त्यांना पुन्हा घरे देणार का ?देणार असेल तर पैसे घेणार आहे का मोफत देणार खुलासा घेण्यात यावा.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : केंद्र शासनाची योजना आहे.मोफत देणार आहे नियमाप्रमाणे कार्यवाही करावी यास मान्यता दयावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉयॅ:नियमाने कार्यवाही करावी.शासनाची योजना आहे.

श्री.मो.जावेद मो.इसहाक:कामगारांना घरे देवून किंवा काही कामगार घेण्यास तयार नसतील शिल्लक राहिल्यास गरीब नागरीकांना देण्यात यावे.

अति.शहर अभियंता :महापालिकेतील सफाई कामगारांना मोफत घरे देण्याचा प्रस्ताव आहे ही योजना शासनाची असून १०० टक्के यास अनुदान देणार आहे.

मा.महापौर : मंजूरी देण्यात येते. शासनाच्या नियमाप्रमाणे गरीब लोकांना अशी घरे देता येत असेल तर त्यांनाही घेण्यात यावे.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासनाने सफाई कामगारांसाठी घरकुल बांधणीच्या निर्णयास मंजुरी दिलेली असल्यामूळे,महानगरपालिकेकडील २२०० सफाई कामगारांसाठी घरकुल बांधणी प्रकल्प हाती घेणेस व सदर घरकुल बांधणीसाठी महाराष्ट्र शासनाकडून अनुदान प्राप्त होत असल्यामूळे, घरकुल बांधणी प्रकल्प राबविण्यासाठी पात्र लाभार्थी निवडीचे सर्व्हेक्षण करणे, सविस्तर अंदाजपत्रके/आराखडे तयार करणे, सविस्तर प्रकल्प अहवाल दाखल करून शासनाची मंजुरी मिळविणे इत्यादी कामे करण्यासाठी प्रकल्प अंदाजपत्रकीय रकमेच्या २% दराने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नेमणुकीचे अधिकार आयुक्त,महानगरपलिका औरंगाबाद यांना प्रदान करणेस तसेच उक्त प्रस्तावित प्रमाणे महानगरपालिकेकडील २२०० सफाई कामगारांसाठी घरकुल बांधणीच्या प्रकल्पास मंजुरी मिळणे तसेच सदर घरकुल बांधणी प्रकल्पासाठी महानगरपालिकेची जमीन (शासकीय जमीन) उपलब्ध करून देण्यास तसेच शासनाच्या नियमाप्रमाणे गरीब लोकांना अशी घरे देता येत असेल तर त्यांनाही घेण्यात यावे यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ३०३ :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००८-०९ हा अर्थसंकल्प मा.सर्वसाधारण सभेने मंजुर केला आहे. त्यात अतिक्रमण हटविल्यानंतर त्या ठिकाणी रस्त्याचे खडीकरण करणे, यासाठी WGB-६ या पानावर अ.क्र.२१ अन्वये रू.२५ लक्ष एवढी तरतुद केली आहे. मात्र यावर्षी मोठया प्रमाणावर रस्ते रूंदीकरणासाठी जागा उपलब्ध करून मिळाल्याने अर्थसंकल्पातील तरतुद अपुरी पडत आहे. त्यामुळे या कामासाठी अतिरीक्त निधीची आवश्यकता भासत आहे. त्या अनुषंगाने जी कमी तातडीची कामे आहेत किंवा ज्या कामासाठी अतिरीक्त तरतुद आहे त्यातील निधी या कामासाठी वळवावा लागणार आहे. त्यानुसार तपासणी केली असता उत्सव मंगल कार्यालय ते मुथीयान कॉर्नर या कामासाठी W-३ वर अ.क्र.१५ वर या कामासाठी तरतुद आहे. तर W-५ चे अ.क्र.३५ वरही त्यासाठी अतिरीक्त तरतुद रू.२५ लक्ष एवढी आहे. हि अतिरीक्त तरतुद रू.२५ लक्ष (मुळ रस्ते दुरूस्ती व पॅचवर्क) चे लेखाशिर्ष बदलुन बांधकाम -२ अंतर्गत अतिक्रमण काढलेले रस्ते विकसीत करणे असे बदलण्याचा प्रस्ताव आहे. याशिवाय विविध भागात पेव्हर ब्लॉक बसविण्यासाठी शहरी भागात कॉंक्रीट रस्ते तयार करणे लेखाशिर्षाखाली WSC-३ ते WSC-६ अ.क्र.१ ते ९६ अंतर्गत जी रू.५००.५० लक्ष रूपयाची तरतुद आहे त्याचे लेखाशिर्ष बदलून वरीलप्रमाणे अतिक्रमण काढलेल्या रस्त्याचा विकास करणे असे करणेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

संवाद :

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:जो रस्त्यावरील अतिक्रमण काढले व तो रस्त्याचे काम केले नाही तर पून्हा अतिक्रमण होतील त्यासाठी नियोजन करून हे काम लवकरात लवकर करावे.

श्री.गजानन बारवाल :किती व कोणते रस्ते रूंदीकरण करणार आहेत त्यासाठी मटेरियल किती लागणार आहे व कोणत्या कामातून वळती करणार आहोत सविस्तर माहिती घेवून पूढील बैठकीत योग्य निर्णय घ्यावा.

डॉ.भागवत कराड :पुढील बैठकीत सविस्तर माहितीसह ठेवण्याचे आदेशीत करावे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:मान्यता दयावी माहिती पुढील बैठकीत मागवावी.

श्री.गजानन बारवाल :किती खर्च लागणार आहे व कोणत्या कामातील रक्कम काढणार आहे याची सविस्तर माहिती घ्यावी

श्री.त्र्यंबक तुपे :मंजूर करण्यास हरकत नाही तातडीच्या कामासाठी निधी उपलब्ध आहे का याची माहिती घ्यावी तसेच कोणकोणती कामे करणार याचाही खुलासा घेण्यात यावा.

श्री.सतीष कटकटे :रस्त्यावरील लाईटचे खांब ड्रेनेज लाईन शिफ्ट करावे लागणार आहे ते सुध्दा प्रस्तावात यावे.

मा.महापौर : अतिक्रमण काढल्यानंतर विकास कामे करण्यासाठी हा प्रस्ताव दिलेला आहे. ५००.५० लक्षची रक्कम वळती करणार आहे, ती कामे कोणती व ज्या ज्या भागात विकासावर खर्च करणार आहे, त्या नावाचा यात उल्लेख नाही. त्यासाठी याचा सविस्तर उल्लेख करून पूढील बैठकीत हा प्रस्ताव ठेवण्यात यावा.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अतिक्रमण काढल्यानंतर विकास कामे करण्यासाठी हा प्रस्ताव दिलेला असल्यामूळे, ५००.५० लक्षची रक्कम वळती करणार असल्यामूळे, ती कामे कोणती व ज्या ज्या भागात विकासावर खर्च करणार आहे, त्या नावाचा यात उल्लेख नसल्यामूळे, त्यासाठी याचा सविस्तर उल्लेख करून पूढील बैठकीत हा प्रस्ताव ठेवण्यास मान्यता देण्यांत आली.

विषय क्र. ३०४ :

मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शासनाचे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वसाहतीमधील कामे हाती घेण्यासाठी वर्ष-२००८-२००९ साठी प्राप्त होणाऱ्या अनुदानातुन हाती घ्यावयाच्या प्रस्तावित सुविधा कामाची ढोबळ अंदाजपत्रक रकमेसह मंजुरीसाठी खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

(आकडे लाखात)

अ.क्र.	कामाचे नांव	ढोबळ अ.प.रक्कम
१	प्र.क्र.२३,नविन मसनतपुर येथील अंतर्गत रस्त्याचे खडीकरण करणे व डांबरीकरण करणे बाबत.	०७.००
२	प्र.क्र.२३,मसनतपुर येथे भूमीगत जलनि:सारण वाहिनी टाकणे बाबत.	०५.००
३	प्र.क्र.२३,नविन मसनतपुर येथे नविन पाणी पुरवठा वाहिनी टाकणे बाबत.	०३.००
	एकुण	**१५.००**

तरी वर प्रस्तावित नुसार शासनाचे दलित वस्ती सुधार योजनांचे अनुदानातुन हाती घ्यावयाचे तीन कामासाठीचे एकत्रित रक्कम रूपये १५.०० लक्ष खर्चाचे ढोबळ अंदाजपत्रक रकमेचे कामे हाती घेण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभागृहाचे विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

संवाद :

श्री.कचरू मोरे :यासाठी शासनाकडून किती निधी मिळतो याची माहिती दयावी.

मा.महापौर : हा विषय मंजूर करण्यात येतो. या योजनेसाठी किती रक्कम शासनाकडून मिळते, याची माहिती पूढील बैठकीत देण्यात यावी.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासनाचे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वसाहतीमधील कामे हाती घेण्यासाठी वर्ष-२००८-२००९ साठी प्राप्त होणाऱ्या शासनाचे दलित वस्ती सुधार योजनांचे अनुदानातुन हाती घ्यावयाचे प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.०१ ते ०३ कामासाठीचे एकत्रित रक्कम रूपये १५.०० लक्ष खर्चाचे ढोबळ अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ३०५ :

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, स्वर्ण जयंती स्वयंरोजगार योजने अंतर्गत महिला बचतगट व पर्यटनाच्या दृष्टीकोनातून बाजारपेठसाठी १ एकर जागा उपलब्ध करून देणे बाबत मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परीषद तथा अध्यक्ष,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी दिनांक ३०.०४.२००८ व दिनांक १९.०९.२००८ अन्वये पत्र देवुन विनंती केली आहे.

औरंगाबाद शहर हे ऐतिहासिक शहर असून जागतीत पर्यटनाच्या दृष्टीने शहराचे विशेष महत्व आहे. दारिद्र रेषेखालील बचतगटांनी उत्पादीत केलेल्या मालाला बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी दिल्ली हटच्या धर्तीवर महानगरपालिका कार्यक्षेत्रात जागा निश्चित करून द्यावयाची आहे. सद्यस्थितीत गरवारे स्टेडीयमच्या पूर्वेस औरंगाबाद हट साठी जागा निश्चित करण्यात आलेली आहे. सदर जागेच्या उत्तरेस काही जागा शिल्लक आहे. याठिकाणी महिला बचत गटास जागा उपलब्ध करून दिल्यास सदरचा प्रकल्प राबविणे शक्य होईल. प्रकल्पाचे उद्दीष्ट व त्याबाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

०१. दारीद्र रेषेखालील व्यक्तींना गटामार्फत दारीद्र रेषेच्यावर आणण्यासाठी त्यांची क्षमता बांधणी करणे, प्रशिक्षण देणे,मालाची विक्री करण्यासाठी बाजारपेठ उपलब्ध करून देणे.

०२. चांगल्या व दर्जेदार वस्तुची निर्मिती करण्याचे प्रशिक्षण देणे,नविन तंत्रज्ञान उपलब्ध करून देणे,ग्राहकाशी वर्तवणूक व विक्रीला इत्यादीचे ज्ञान देणे.

०३. ग्राहकाचे समाधान कसे होईल यासाठी वस्तुचे चांगले डिझाईन्स पॅकेजींग,वस्तुची विक्री, लेबलींग,धंद्याचे कौशल्य इत्यादी बाबत.

०४. फुडप्रोसेसिंग,कॅटरींग व हॉटेल मॅनेजमेंट इत्यादी बाबत प्रशिक्षण देणे.

सदरील प्रकल्प हा शहरात राबविल्यावर दारीद्ररेषेखालील कुटूंबांना रोजगार उपलब्ध करून देण्याचा मुख्य कार्यकारी अधिकार, जिल्हा परिषद तथा अध्यक्ष,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांचा मानस आहे. प्रकल्पाची संपूर्ण मालकी राज्यशासनाची राहणार आहे.

त्याकरीता खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन सदरची जागा जिल्हा परिषदेस २९ वर्षासाठी भाडेतत्वावर देणे योग्य.

०१. सदरच्या जागेचा वापर केवळ स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजने अंतर्गत स्वयं सहाय्यता बचतगट व ग्रामीण कारागीर यांनी उत्पादीत केलेल्या मालाच्या विक्रीसाठीच करण्यात यावा.

०२. सदरील जागेची मालकी पूर्णत: महानगरपालिकेकडे राहील.

०३. सदरील जागेसाठी जिल्हा परिषदेने महानगरपालिकेस दरवर्षी नाममात्र भाडे द्यावे.

०४. सदरील ठिकाणी बांधण्यात यावयाच्या गाळयांसाठी जिल्हा परिषदेने महानगरपालिकेची रितसर परवानगी घ्यावी.

०५. जिल्हा परिषद अथवा गाळेधारक सदरील गाळे/जागा कोणत्याही बँक/संस्थेकडे गहाण,तारण ठेवणार नाही अथवा एखाद्या संस्थेस दिलेला गाळा इतरांना पोटभाडेकरू म्हणून देता येणार नाही.

०६. सदर गाळे बचतगट अथवा ग्रामीण कारागीरांनाच उपलब्ध करून दिले जातील.

०७. सदरील ठिकाणे देण्यात येणारे ६३ गाळयांपैकी ४२ गाळे ग्रामीण भागाकरीता,२१ गाळे शहरी भागाकरीता राखीव ठेवण्यात येतील.

०८. सदरचे गाळे बचतगटांना रोटेशन पध्दतीने उत्पादीत मालाची विक्री करण्याकरीता ग्रामीण भागाकरीता जिल्हा परिषद व शहरी भागाकरीता महानगरपालिका निर्देशीत करील त्या कालावधीकरीता बचतगटांना तात्पुरत्या स्वरूपात उत्पादीत मालाची विक्री करण्याकरीता उपलब्ध करून देण्यात येईल.

०९. सदर ठिकाणच्या विद्युत बिलाची तसेच देखभाल दुरूस्तीची व्यवस्था जिल्हा परिषद यांची राहील.

१०. सदर इमारतीवरील मालमत्ता कर,शासनाचे अन्य देय कर जिल्हा परिषदेस भरावे लागतील.

११. मुदतीनंतर अटी शर्ती मध्ये फेर बदल करण्याचा अधिकार महानगरपालिकेकडे राहील.

याबाबतचे सर्व अधिकार आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांना राखुन ठेवले आहे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

<u>संवाद :</u>

श्री.संजय जोशी :यावर ५० टक्के महानगरपालिकेचा अधिकार असावा.

मा.महापौर :जागेची मालकी पुर्णत महानगरपालिकेकडे राहील.

डॉ.भागवत कराड :जे बचत गट अगोदर येतील त्यांना देण्यात यावे

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:ऐनवेळी असे प्रस्ताव आल्यानंतर त्यावर अभ्यास होत नसल्याने चर्चा करता येत नाही तीन दिवस सर्व सदस्यांना प्रत मिळेल अशी सचिव यांनी व्यवस्था करावी.

मा.महापौर : प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स्वर्ण जयंती स्वयंरोजगार योजने अंतर्गत महिला बचतगट व पर्यटनाच्या दृष्टीकोनातून बाजारपेठसाठी १ एकर जागा उपलब्ध करून देणे बाबत मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परीषद तथा अध्यक्ष,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी दिनांक ३०.०४.२००८ व दिनांक १९.०९.२००८ अन्वये पत्र देवुन विनंती केली असल्यामूळे, गरवारे स्टेडीयमच्या पूर्वेस औरंगाबाद हटसाठी जागा निश्चित करण्यात आलेली असल्यामूळे, सदर जागेच्या उत्तरेस काही जागा शिल्लक असल्यामूळे,प्रकल्पाचे उद्दीष्ट व त्याबाबतची अ.क्र.०१ ते ११ च्या माहितीप्रमाणे, याठिकाणी महिला बचत गटास जागा उपलब्ध करून देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ३०६ :

कार्यकारी अभियंता (ड्रे.वि.उ.व ई.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मा.नगरसेविका श्रीमती खान मेहरून्नीसा हमीद खान वार्ड क्र.२८ यांनी दिनांक २४.०७२००८ रोजी लेखाशिर्ष बदल बाबत पत्र दिलेले आहे. मागणीनुसार खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहे. मा.स्थायी समितीचे शिफारस केल्याप्रमाणे वार्ड क्र.२८ विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे रक्कम रूपये ५ लक्ष पान क्र.WSC ११ अनु क्र.५६ वर नमूद अर्थसंकल्प पुस्तिका सन २००८-०९) या कामा ऐवजी खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदल वार्ड क्र.२८ अंतर्गत विविध मोहल्ल्यामधील ५ फुटाचा गल्ल्यामध्ये जलनि:सारण वाहिन्या टाकलेल्या आहेत त्याचे देखभाल दुरूस्तीचे काम करणे. इत्यादी आवश्यकतेनुसार फुटकळ कामे करणे (रक्कम ३००० ते २५००० पर्यंत) साठी वार्ड कार्यालय-क जाफरगेट येथे वळती करणे.

उपरोक्त प्रमाणे लेखाशिर्ष बदलचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर : मंजूरी देण्यात येते.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.स्थायी समितीने शिफारस केल्याप्रमाणे वार्ड क्र.२८ विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे (रक्कम रूपये ५ लक्ष पान क्र.WSC ११ अनु क्र.५६ वर नमूद अर्थसंकल्प पुस्तिका सन २००८-०९) या कामा ऐवजी वार्ड क्र.२८ अंतर्गत विविध मोहल्ल्यामधील ५ फुटाचा गल्ल्यामध्ये जलनि:सारण वाहिन्या टाकलेल्या आहेत त्याचे देखभाल दुरूस्तीचे काम करणे. इत्यादी आवश्यकतेनुसार फुटकळ कामे करणे (रक्कम ३००० ते २५००० पर्यंत) साठी वार्ड कार्यालय-क जाफरगेट येथे वळती करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ३०७ :

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, महिला बचतगटासाठी उपहारगृह/पोळीभाजी केंद्र सेंटरसाठी मा.महापौर यांचे दालनाखालील मोकळी जागा व टप्पा क्र.३ कॅन्टीनच्या बाजुला एका वर्षासाठी जाहीर निविदा/लिलाव पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात खालील प्रमाणे भाडेतत्वावर द्यावयाचे आहे.

अ. क्र.	जागेचा तपशिल	क्षेत्रफळ	अनामत रक्कम	प्रती माह भाडे प्रती चौ.मी.	व्यवसायाची वेळ
०१	मा.पदाधिकारी यांचे दालनाखालील जागा उपहारगृहासाठी (स्नॅक्स व चहासाठी)	२३.४६ चौ.मी.	रू.२०००/-	रू.३५/- (रू.८२१/- प्रती माह)	सकाळी ९.०० ते सायं ७.००
०२	टप्पा क्र.३ कँटीन बाजूची खूली जागा व मुख्य कार्यालय टेबल स्पेस (पोळी भाजी व जेवण)	१०.७३ चौ.मी.	रू.५००/-	रू.३५/- (रू.३८५/- प्रती माह)	दुपारी १.०० ते दु. ३.००

तरी मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळाल्यास सदरील जागा महिला बचत गटासाठी महानगरपालिकेच्या प्रचलित अटी शर्तीनुसार, एक वर्षाचे आगाऊ भाडे भरणा करून घेवून, करारनामा करून तात्पुरत्या स्वरूपात भाडेतत्वावर देण्यात येईल.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर : मंजूरी देण्यात येते.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महिला बचतगटासाठी उपहारगृह/पोळीभाजी केंद्र सेंटरसाठी मा.महापौर यांचे दालनाखालील मोकळी जागा व टप्पा क्र.३ कॅन्टीनच्या बाजुला एका वर्षासाठी जाहीर निविदा/लिलाव पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात खालील प्रमाणे भाडेतत्वावर सदरील जागा महिला बचत गटासाठी महानगरपालिकेच्या प्रचलित अटी शर्तीनुसार, एक वर्षाचे आगाऊ भाडे भरणा करून घेवून,करारनामा करून तात्पुरत्या स्वरूपात भाडेतत्वावर देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

अ. क्र.	जागेचा तपशिल	क्षेत्रफळ	अनामत रक्कम	प्रती माह भाडे प्रती चौ.मी.	व्यवसायाची वेळ
०१	मा.पदाधिकारी यांचे दालनाखालील जागा उपहारगृहासाठी (स्नॅक्स व चहासाठी)	२३.४६ चौ.मी.	रू.२०००/-	रू.३५/- (रू.८२१/- प्रती माह)	सकाळी ९.०० ते सायं ७.००
०२	टप्पा क्र.३ कँटीन बाजूची खूली जागा व मुख्य कार्यालय टेबल स्पेस (पोळी भाजी व जेवण)	१०.७३ चौ.मी.	रू.५००/-	रू.३५/- (रू.३८५/- प्रती माह)	दुपारी १.०० ते दु. ३.००

वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ३०८ :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२९ हिनानगर औरंगाबाद टाईम्स कॉलनी येथे आर.सी.सी. पूल बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.१५ लक्ष सन २००६-०७ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आले होते. सदरील कामाचा खर्च सन २००७-०८ मधील अर्थसंकल्पातील नवीन खडी रस्ते या लेखाशिर्षांतर्गत पान क्र.१८४/ अ.क्र.७ मधून करण्यात येणार आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती सभेने दिनांक ४.९.२००७ च्या सभेत विषय क्र.१०३ अन्वये मंजूरी प्रदान केलेली आहे. सदरील काम करतांना पूलाच्या दोन्ही बाजूस पोच रस्ता तयार करणे व साईड गटार बांधणे आवश्यक आहे. त्यामूळे मूळ कामात वाढ होणार आहे. यासाठी संबंधीत प्रभागातील स.नगरसेवक यांनी त्याच प्रभागातील विविध ठिकाणी संरक्षित भिंत दुरूस्त करणे पान क्र.डब्ल्यु.एस.सी.१४ वरील र.रू.५ लक्ष व वार्ड क्र.२९ अंतर्गत पंचायत समितीजवळ मेन लिव्हर लाईन टाकणेसाठी पान क्र. डब्ल्यु.जी.बी.२० वरील र.रू.५ लक्ष असे एकुण १० लक्षच्या उपरोक्त नमुद कामा ऐवजी वार्ड क्र.२९ अंतर्गत हिनानगर औरंगाबाद टाईम्स कॉलनी येथे आर.सी.सी पुल बांधणेच्या कामामध्ये र.रू.१० लक्ष वाढ करून या कामामध्ये वळती करणे बाबत मागणी केलेली आहे.

तरी उपरोक्त प्रभाग क्र.२९ हिनानगर औरंगाबाद टाईम्स कॉलनी येथे आर.सी.सी.पुल बांधणेच्या कामासाठी वार्ड क्र.२९येथे विविध ठिकाणी संरक्षीत भिंत दुरूस्त करणेच्या कामासाठीचे र.रू.५लक्ष व वार्ड क्र.२९अंतर्गत पंचायत समितीजवळ मेन लिव्हर लाईन टाकणेसाठीची र.रू.५ लक्ष असे एकुण १० लक्ष मुळ कामामध्ये वळती करण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

मा.महापौर : मंजूरी देण्यांत येते.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,वॉर्ड क्र.२९ हिनानगर औरंगाबाद टाईम्स कॉलनी येथे आर.सी.सी. पूल बांधणेचे काम करतांना पूलाच्या दोन्ही बाजूस पोच रस्ता तयार करणे व साईड गटार बांधणेच्या वाढीव कामासाठी संबंधीत प्रभागातील विविध ठिकाणी संरक्षित भिंत दुरूस्त करणे पान क्र.डब्ल्यु.एस.सी.१४ वरील र.रू.५ लक्ष व वार्ड क्र.२९ अंतर्गत पंचायत समितीजवळ मेन लिव्हर लाईन टाकणेसाठी पान क्र. डब्ल्यु.जी.बी.२० वरील र.रू.५ लक्ष असे एकुण १० लक्षच्या उपरोक्त नमुद कामा ऐवजी वार्ड क्र.२९ अंतर्गत हिनानगर औरंगाबाद टाईम्स कॉलनी येथे आर.सी.सी पुल बांधणेच्या कामामध्ये र.रू.१० लक्ष वाढ करून या कामामध्ये वळती करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

चर्चा :

डॉ.भागवत कराड :माजी महापौर स.श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय यांचा ६१ व्या वाढदिवसा निमित्ताने किमान ३-४ दिवस त्यांचे नावाचे पोस्टर्स शहरात विविध ठिकाणी लावण्याची मंजूरी दयावी.

मा.महापौर :मान्यता देण्यात येते.

याच बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद.

औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

दिनांक २०.०९.२००८ रोजी आयोजित सर्वसाधारण सभेतील प्रश्नोत्तरे

श्री.सतिष कटकटे,स.पालिका सदस्य

प्रश्न क्र.२९ :

०१. महानगरपालिकेने आज पर्यंत किती भूसंपादन केले? कोठे कोठे? किती जागा? व कोणत्या दराने? (सन २००० पासून)

०२. भूसंपादनापोटी प्रतिवर्षी आज पावेतो किती रक्कम अदा करण्यात आली? व कोणाकोणास?

०३. भूसंपादन केलेले कोणकोणत्या जागेच्या पी.आर. कार्डवर मनपाची नोंद करण्यात आली? कोणत्या जागेच्या पी.आर कार्डवर नोंद घेणे बाकी आहे?

०४. आता पर्यंत भूसंपादीत केलेल्या जागेवर मनपाचा बोर्ड लावला आहे का? त्या जागेस तार कंपाऊंड करण्यात आले काय? नसल्यास का?

०५. भूसंपादन केल्यावर पी आर कार्डवर नाव टाकुन घेण्याची जबाबदारी कोणाची मनपाची की भूसंपादन करून देणाऱ्या व्यक्तीची. भूसंपादनाचा धनादेश अदा करण्याची नियमावली काय? केव्हा अदा करावा?

उत्तर :

अप्राप्त

श्री.सतिष कटकटे,स.पालिका सदस्य

प्रश्न क्र.३० :

बचत गटास महानगरपालिकेतर्फे वाहन खरेदी करण्यात आलेले आहेत. सदरील वाहन खरेदी करण्यापुर्वी कोणत्या कंपनीचे वाहन घ्यावयाचे याबाबत सर्वसाधारण सभेस कळविण्यात आले होते का? असल्यास कधी?

प्रकल्प संचालक (सुजयो)

उत्तर :

सर्वसाधारण सभा ठराव क्र.११३२ दिनांक २९/०९/२००८ नुसार महिलांना रोजगार मिळवून देण्याच्या उद्देशाने ए.एम.सी. टॅक्सी कॅब उपक्रम राबविण्यास मान्यता मिळाली आहे. त्यानुसार महानगरपालिकेर्फे सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत स्थापन केलेल्या व्यवसाय गटाच्या प्रस्ताव व ठरावा नुसार बँकेने या गटांना व्हर्सा गाडया दिलेल्या आहेत त्या गटास केंद्र शासनाकडून रू.१,२५०००/- अनुदान दिलेले आहे.

सदरील गाडया कोणत्या बचतगटास देण्यात आल्या त्या देतांना कोणते निकष लावण्यात आलेत.

उत्तर :

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत १. अंकुर महिला बचत गट,फुलेनगर उस्मानपुरा २. भिमाई महिला बचत गट-१,घाटी जयभिमनगर ३भिमाई महिला बचत गट-२,घाटी जयभिमनगर दारिद्र रेषे खालील या तीन गटाना व्हर्सा गाडी देण्यात आल्या आहेत. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या व ज्यांना खेळते भांडवल मिळाले आहे. असे गट सदर योजनेत पात्र असतात सदर गटानी अर्ज केल्यामुळे या गटांना आय.डी.बी.आय बँक मनपा शाखा कडून कर्ज उपलब्ध करून दिले आहे.

गाडी खरेदी करते वेळी गाडीची किंमत काय होती? (On Road) सदर गाडी पेट्रोल ची आहे की डिझेल गाडी गाडीचे ॲव्हरेज काय?

उत्तर :

गाडी खरेदी करते वेळी गाडीची किंमत रू.४,५३,८८२/- होती सदरची गाडी पेट्रोलची आहे.

गाडीचे हप्ते वेळेवर भरणा केले आहेत काय? हप्ते थकीत असल्यास किती हप्ते थकीत आहेत व त्यास जबाबदार कोण?सध्या किती गाडया चालू आहेत? व त्यावर नियंत्रण कोणाचे आहे?

उत्तर :

पेट्रोल इंधनावर चालणारी गाडी आहे अद्याप गाडया रोडवर आलेल्या नाहीत गाडीचे हप्ते भरलेले नाही चार महिन्याचे हप्ते थकीत आहे. असे बचत गटातील महिलाकडून समजते सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत बँकेकडून कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी या विभागाकडून शिफारस करण्यात आलेली आहे. गाडयावर बचत गटाचे नियंत्रण आहे. बँकेचे हप्ते भरण्याबाबत बचतगट जबाबदार आहे.

स्थायी समितीचे मंजुरी नसतांना गाडया खरेदी करता येतात का? मंजुरी नसल्यास कोणत्या नियमाचे व कोणाच्या आदेशाने गाडया खरेदी करता येतात.

उत्तर :

व्यवसाय कोणता करावा हे बचत गट ठरवित असते बतगटाने ठराव प्रस्ताव दाखल केल्यानुसार सदर कर्ज प्रकरण संबंधित बँकेकडे पाठविण्यात आलेले होते सदर गटाच्या कर्ज प्रस्तावास बँकेने मंजूरी दिल्या नंतरच केंद्र शासन पुरस्कृत सुवर्ण जयंती रोजगार योजनेतून संबंधितांना फक्त अनुदान रक्कम रू.१,२५,०००/- सदर गटास वितरीत करण्यात आलेली आहे.

सौ.रजनी रमेश जोशी,स.पालिका सदस्या

प्रश्न क्र.३१ :

०१. जाधववाडी ते पिसादेवी रोडचे रूंदीकरण शासनाच्या ज्या आदेशानुसार होत आहे त्या आदेशाची प्रत व मंजुर नकाशा देण्यात यावा.

०२. जाधववाडी पिसादेवी रोडचे रूंदीकरण जळगांव रोडपासून होत आहे का किंवा कुठपासून होत आहे याचा खुलासा व्हावा.

०३. जाधववाडी पिसादेवीरोड सध्या २४ मिटर रूंद आहे. त्याची रूंदी ४५ मिटर होणार आहे. तेव्हा हे रूंदीकरण रोडच्या उजव्या बाजुस (मार्केट यार्डच्या विरूध्द बाजुस) किंवा रोडच्या डाव्याबाजुस (मार्केट यार्ड व कामधेनु सोसायटीकडे) होणार आहे याचे स्पष्टीकरण करण्यात यावे अथवा रोडचे रूंदीकरण रोडच्या मध्यापासून (सेंटर पॉइंट पासून) दोन्ही बाजुस समान अंतराने होणार आहे का. याबाबतचा खुलासा करण्यांत यावा.

उत्तर :

अप्राप्त

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद